शनिवार, १८ मार्च २०२३ ◆ वर्ष १५ ◆ अंक २३८
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

३५० दुर्गांवरील माती, पाण्याने किल्ले रायगडावर जलाभिषेक/२
रायगडात 'अवकाळी'ने शेतकरी आणि बागायतदारांचे नुकसान/५
आजपासून अलिबागमध्ये कला, क्रीडा महोत्सव/८

## ऑस्ट्रेलियाविरुद्ध वनडेत भारताची विजयी सलामी



**मुंबई** : येथील वानखेडे स्टेडियमवर शुक्रवारी (दि. १७) खेळल्या गेलेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाचा पाच गडी राखून पराभव केला. नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियन संघ ३५.४ षटकांत १८८ धावांवर गारद झाला. 'कांगारू'कडून मिचेल मार्शने सर्वाधिक ८१ धावांची खेळी केली. प्रत्युत्तरात भारताने ३९.५ षटकांत पाच गडी गमावून लक्ष्य गाठले. केएल राहुल लयीत परतला आणि त्याने चांगली फलंदाजी करताना ९१ चेंडूंत ७५ धावांची नाबाद खेळी केली. त्याच्याशिवाय रवींद्र जडेजाही ४५ धावा करून नाबाद राहिला. दोघांमध्ये सहाव्या विकेटसाठी १०८ धावांची नाबाद भागीदारी झाली. या विजयासह भारताने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

# महाराष्ट्राची विकासात्मक वाटचाल

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांचे अभिनंदन अन् आभार!

### राज्याचा सर्वसमावेशक अर्थसंकल्प मांडल्याबद्दल अधिवेशनात केले कौतुक

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्याचा सर्वसमावेशक अर्थसंकल्प सादर झाल्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन व आभार व्यक्त केले. त्याचबरोबर त्यांनी पनवेल, उरणसह रायगड जिल्ह्याला पुढील काळात आवश्यक असलेल्या बाबींचा उल्लेख करीत तशी मागणीही या वेळी केली.

**विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन**



अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर सभागृहात बोलताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारभाराला आदर्श व शिरोधार्य मानून या महाराष्ट्रात महिलांचा सन्मान, ओबीसी, आदिवासी, मागासवर्गीय आणि सर्व समाज घटकांचा विकास घडविण्याच्या दृष्टिकोनातून काम सुरू आहे. एकीकडे शाश्वत शेती, तर दुसरीकडे युवकांच्या हाताला काम, पर्यावरणाचा समतोल, पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी या महाराष्ट्राचा जो पंचतीर्थ असा अर्थसंकल्प मांडलाय त्याबद्दल मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करतो आणि अर्थसंकल्पाला पाठिंबा देतो. यंदाचे हे वर्ष छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्याचे ३५०वे वर्ष आहे आणि शिवरायांची राजधानी असलेल्या

**पनवेल, उरणसह रायगड जिल्ह्याला विविध सेवा देण्याची मागणी**

रायगडावर विविध कार्यक्रम होणार आहेत. शिवराय या महाराष्ट्राचा श्वास, अभिमान आहे आणि म्हणूनच राज्याभिषेक सोहळ्याच्या माध्यमातून पुढच्या पिढ्यांना प्रेरणा मिळत राहील अशा पद्धतीने हा सोहळा व्हावा यासाठी ३५० कोटी रुपयांची तरतूदही होणार आहे. त्याबद्दल मी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांचे मनापासून अभिनंदन करतो.

पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांनी २०१४ साली सूत्रे स्वीकारली तेव्हापासून देशाने विकासाची नवी दृष्टी स्वीकारलेली आहे. त्यामुळे संपूर्ण देश कोणाच्या मेहरबानीची प्रतीक्षा न करता प्रत्येक राज्य स्वतःच्या क्षमतांचा विकास करीत या प्रगतीची कास स्वीकारतोय. याच दृष्टिकोनातून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून २०१४ साली ज्या वेळेला देवेंद्र फडणवीस यांनी सूत्रे स्वीकारली त्यानंतर राज्याने एका अर्थाने कात टाकली. (पान २ वर..)

## शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही -मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

### अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे सुरू

**मुंबई : प्रतिनिधी**



अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे सुरू आहेत. या संदर्भात नांदेड, नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधून त्यांना निर्देश दिले आहेत. नियम, निकष डावलून यापूर्वी शेतकऱ्यांना मदत केली आहे, आजही आपण मदत करीत असून हे शेतकऱ्यांचे सरकार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी (दि. १७) अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान विधानसभेत दिली.

विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचा मुद्दा विधानसभेत उपस्थित केला. त्यावर मुख्यमंत्री शिंदे बोलत होते.

अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीसंदर्भात काल नांदेड आणि नाशिक जिल्हाधिकाऱ्यांशी बोललो आहे. त्यांना तातडीने नुकसानीचे पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार आज अर्धापूर आणि मुदखेड या तालुक्यात नांदेड जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पंचनामे करण्याचे काम सुरू आहे, तर नाशिक जिल्ह्यातदेखील नुकसानग्रस्त भागात पंचनामे सुरू आहेत. या नुकसानीचा अहवाल लवकरच शासनाला प्राप्त होईल. गेल्या आठवड्यातील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे जवळपास पूर्ण झालेले आहेत, असे सांगून कालपासून ज्या ठिकाणी पाऊस पडत आहे, त्या भागातदेखील पंचनामे सुरू असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी या वेळी सांगितले.

## कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या अनुदानात वाढ

**मुंबई** : कांद्याला देण्यात येणाऱ्या सानुग्रह अनुदानात वाढ करण्यात आली आहे. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना आता ३०० रुपयांऐवजी ३५० रुपयांचे अनुदान देण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी (दि. १७) केली. आदिवासींच्या वनजमिनीच्या दाव्याबाबत समिती स्थापन करण्याचेही जाहीर करण्यात आले आहे. या समितीत माजी आमदार जीवा गावित आणि आमदार विनोद निकोले यांचा समावेश असणार आहे. सरकार सगळ्याच मागण्यांबाबत सकारात्मक असून आता लाँग मार्च मागे घेण्याचे आवाहन मुख्यमंत्री शिंदे यांनी केले आहे.

## ई-रिक्षासाठी माथेरान बंद; अधीक्षक कार्यालयावर मोर्चा



(छाया : विजय मांडे)

> **ई-रिक्षा आणि क्ले पेव्हर रस्त्यांबाबत माथेरानकरांनी दिलेले निवेदन आम्ही जिल्हाधिकाऱ्यांना सादर करून इथली परिस्थिती निदर्शनास आणून देणार आहोत.**
> **-दीक्षांत देशपांडे, अधीक्षक माथेरान**

**कर्जत : प्रतिनिधी**

ई-रिक्षा पूर्ववत सुरू व्हावी यासाठी शुक्रवारी (दि. १७) माथेरान बंद ठेवण्यात आले होते. त्याचप्रमाणे नागरिकांनी अधीक्षक कार्यालयावर मोर्चा नेला. या वेळी विविध घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.

माथेरानमध्ये तीन महिन्यांच्या पायलेट प्रोजेक्टनंतर ई-रिक्षा बंद करण्यात आल्या आहेत. ही सेवा पुन्हा सुरू करावी तसेच धूळविरहित रस्त्यांची कामे ताबडतोब करण्यात यावीत या मागणीसाठी नागरिकांसह व्यापाऱ्यांनी बंद पाळून अधीक्षक कार्यालयावर भव्य मोर्चा काढला. (पान २ वर..)

## उरण मतदारसंघासाठी १४७.५० कोटी रुपयांचा निधी मंजूर

### आमदार महेश बालदी यांच्या मागणीनुसार अर्थसंकल्पात तरतूद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



उरण विधानसभा मतदारसंघासाठी आमदार महेश बालदी यांच्या मागणीनुसार राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये १४७.५० कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. प्रामुख्याने हा निधी रस्त्यांच्या विकासासाठी आहे.

यामध्ये ग्रामीण मार्गाकरिता ४७.५० कोटी, प्रमुख जिल्हा मार्गासाठी ५८ कोटी, कोन-सावळे रस्त्याच्या उर्वरित कामासाठी २० कोटी रुपये, दांड-तुराडे रस्त्यासाठी १९ कोटी रुपये आणि गुळसुंदे-जांभिवली-कराडे रस्त्यासाठी तीन कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे. त्याबद्दल आमदार महेश बालदी यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांचे आभार व्यक्त केले.

महेश बालदी हे उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार झाल्यानंतर या मतदारसंघाचा झपाट्याने विकास होत आहे. (पान २ वर..)

## एक्स्प्रेस वेवर अपघातात तिघांचा मृत्यू

**खोपोली : प्रतिनिधी**



(छाया : जयवंत माडपे)

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर ट्रकला कारची धडक बसल्याने तीन जणांचा जागीच मृत्यू झाला. मावळ तालुक्यातील उर्से गावाजवळ शुक्रवारी (दि. १७) सकाळी हा भीषण अपघात झाला.


मिळालेल्या माहितीनुसार मुंबईहून पुण्याच्या दिशेने निघालेली कार (एमएच ०४ जेएम ५३४९) एक्स्प्रेस वेवर उर्से गावाजवळ उभ्या असलेल्या ट्रकला (आरजे ०९ जीबी ३६३८) मागून जोरदार धडकली. हा अपघात एवढा भीषण होता की, कारमधील चालकासह दोन प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला.

अपघातानंतर आयआरबी पेट्रोलिंग, देवदूत यंत्रणा, लोकमान्य हॉस्पिटलच्या यंत्रणेने मदतकार्य केले तसेच महामार्ग पोलिसांच्या मार्गदर्शनाखाली अपघातग्रस्त वाहने बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यात आली.

## खालापूरच्या सावरोलीत बालिकेवर अत्याचार; नराधम गजाआड

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील सावरोली येथील सात वर्षांच्या बालिकेवर अत्याचाराची घटना घडली असून या प्रकरणी नराधमास खालापूर पोलिसांनी अटक केली आहे. आरोपीला न्यायालयात हजर केले असता सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.



सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार रामभवन उर्फ गुड्डू धनिराम गौतम (वय ३०, सध्या रा. सावरोली, ता. खालापूर, मूळ उत्तर प्रदेश) असे आरोपीचे नाव असून त्याने बुधवारी रात्री सात वर्षांच्या बालिकेस तिच्या घराजवळून उचलून मित्राच्या रूमवर नेऊन लैंगिक अत्याचार केला. ही बाब समजल्यानंतर अत्याचारग्रस्त बालिकेच्या पालकांनी खालापूर पोलीस ठाणे गाठले व तक्रार दिली. या तक्रारीवरून खालापूर पोलिसांनी आरोपीला गजाआड करून गुन्हा दाखल केला आहे. आरोपीला न्यायालयाने सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## पनवेल महापालिकेचे २३१६ कोटींचे अंदाजपत्रक मंजूर



### आरोग्यविषयक पायाभूत सुविधांवर भर

**पनवेल : प्रतिनिधी, वार्ताहर**

पनवेल महापालिकेचे सन २०२३-२४चे २३१६ कोटींचे वस्तुनिष्ठ व विकासाभिमुख अंदाजपत्रक शुक्रवारी (दि. १७) झालेल्या प्रशासकीय सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आले. त्यामुळे विकासाला चालना मिळणार आहे.

महापालिकेचे मुख्य लेखा अधिकारी मंगेश गावडे यांनी २१ मार्च रोजी झालेल्या प्रशासकीय स्थायी समितीच्या बैठकीत आयुक्त तथा प्रशासक गणेश देशमुख यांच्याकडे अंदाजपत्रक सुपूर्द केले होते. आजच्या सभेत देशमुख यांनी ते मंजूर केले. या अंदाजपत्रकात महापालिका क्षेत्रातील पायाभूत सुविधा ज्यामध्ये मुख्यत्वे आरोग्यसेवा, पाणीपुरवठा, मलनिस्सारण, झोपडपट्टी पुनर्विकास यांच्यावर भर देण्यात आला आहे.

या सभेस उपसंचालक ज्योती कवाडे, उपायुक्त विठ्ठल डाके, सचिन पवार, गणेश शेटे, कैलास गावडे, शहर अभियंता संजय जगताप, मुख्य लेखा अधिकारी मंगेश गावडे, उपअभियंता संजय कटेकर, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे, लेखा परीक्षक विनयकुमार पाटील, लेखाधिकारी डॉ. संग्राम व्होरकाटे, नगरसचिव तिलकराज खापर्डे आदी उपस्थित होते.

नागरिकांच्या आरोग्याचा दर्जा उंचावण्यासाठी ४५० खाटांचे सुसज्ज माता व बाल संगोपन रुग्णालय, संसर्ग आजारांवर इन्फेशियस लॅब, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत नव्याने नऊ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, शहरी समुदाय आरोग्य केंद्र, मोबाईल मेडिकल युनिट उभारण्यात येणार आहेत. याचबरोबर भविष्यकालीन शैक्षणिक दृष्टिकोन ठेवून महापालिकेने पहिली ते पाचवीपर्यंतच्या इंग्रजी माध्यमांच्या शाळा सुरू करण्याचा प्रस्ताव तयार केला आहे.

आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा, रस्ते अशा गुणवत्तापूर्ण पायाभूत सोयीसुविधांबरोबरच शहर सुशोभीकरण, झोपडपट्टी पुनर्विकास अशा महत्त्वाच्या गोष्टींचाही या अंदाजपत्रकात समावेश करण्यात आला आहे.



# सांस्कृतिक विभाग सदैव कलावंतांच्या पाठीशी



## मंत्री सुधीर मुनगंटीवार यांची ग्वाही

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पुरस्कारप्राप्त कलावंतांना यापुढे सरसकट अ वर्गाचे निवृत्तीवेतन देणार असल्याची घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री श्री सुधीर मुनगंटीवार यांनी गुरुवारी (दि. १६) केली.


वाशी येथील नेताजी सुभाषचंद्र बोस क्रीडा संकुलात आयोजित तमाशा महोत्सवात तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर जीवनगौरव पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी मंत्री मुनगंटीवार बोलत होते. या वेळी आमदार मंदा म्हात्रे, सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, सांस्कृतिक कार्य संचालक विभीषण चवरे, अभिनेत्री प्रिया बेर्डे, अभिनेता संदीप पाठक आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी बोलताना मंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, कलावंत जेव्हा आपल्या समस्या घेऊन सांस्कृतिक विभागाकडे येतील तेव्हा सांस्कृतिक विभाग कलावंतांच्या पाठीशी सदैव ठामपणे उभा राहील. ते पुढे म्हणाले की, सांस्कृतिक क्षेत्रामध्ये चेहऱ्यावर आनंद देण्याची शक्ती आहे. जगातील महागडे सौंदर्यप्रसाधन म्हणजे चेहऱ्यावरील हास्य व आनंद आहे, ते देण्याची ताकद कलावंतांमध्ये आहे.ही शक्ती आणि उर्जा कायम त्यांच्याकडे रहावी.

या वेळी सन २०१८-१९चा तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर जीवनगौरव पुरस्कार कै. गुलाबबाई संगमनेरकर यांना जाहीर करण्यात आला होता. हा पुरस्कार त्यांच्या कन्या अलका संगमनेरकर व कल्पना संगमनेरकर यांनी मंत्री मुनगंटीवार यांच्या हस्ते स्वीकारला, तर सन २०१९-२०चा पुरस्कार अतांबर शिरढोणकर यांना आणि सन २०२०-२१चा पुरस्कार संध्या रमेश माने यांना प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमावेळी वरुणराजाने अचानक हजेरी लावली. तरीही उघड्या मैदानात असलेला हा कार्यक्रम तेथेच झाला. या वेळी बोलताना तमाशा कलावंतांच्या वतीने अतांबर शिरढोणकर यांनी त्यांच्या भावना मांडल्या. बऱ्याच वर्षांनंतर सांस्कृतिक विभागाला सुधीरभाऊंसारखा धडाडीचा मंत्री लाभला आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

## लिव्हिंग द ग्रेटर लाइफ पुस्तकाचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रकाशन



**मुंबई : प्रतिनिधी**

लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष आणि राज्याचे राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांचे सुपुत्र यशराज देसाई यांच्या 'लिव्हिंग द ग्रेटर लाइफ' या पुस्तकाचे विधानभवन येथे प्रकाशन करण्यात आले. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले.

याप्रसंगी अन्न व औषध प्रशासन मंत्री संजय राठोड, राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभुराज देसाई, विधानसभेचे विरोधी पक्ष नेते अजित पवार, माजी मंत्री जयंत पाटील, आमदार अनिल बाबर, भरत गोगावले, बालाजी कल्याणकार, भिमराव तापकीर, महेंद्र दळवी, अतिरिक्त मुख्य सचिव मिलींद म्हैसकर, मंत्रालयातील विविध वरिष्ठ अधिकारी यांच्यासह एपीके प्रकाशनचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## खारघर येथे ई-सिगरेट, विदेशी सिगरेटची विक्री; एकावर गुन्हा दाखल



**पनवेल : वार्ताहर**

खारघर सेक्टर ४मधील पान शापमधून छुप्या पद्धतीने ई-सिगरेट आणि विदेशी सिगरेटची विक्री करणाऱ्या व्यक्तीला पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने छापा मारून अटक केली आहे. मिथलेश माणिकचंद साहु (३९) असे या पान शॉपचालकाचे नाव असून अमली पदार्थ विरोधी पथकाने त्याच्या पान शॉपमधून सुमारे ४५ हजार रुपये किमतीचे ई-सिगरेट आणि विदेशी सिगरेट जप्त केले आहेत.

**पान शॉपचालक जेरबंद**

खारघर सेक्टर ४मधील भूमी टावर येथील सौरभ पानशॉपमधून ई-सिगरेट आणि विदेशी सिगरेटची विक्री करण्यात येत असल्याची माहिती नवी मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थविरोधी पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बी. एस. सय्यद आणि त्यांच्या पथकाने भूमी टॉवरमधील सौरभ पानशॉपवर छापा मारला.

या वेळी अमली पदार्थ विरोधी पथकाने तपासणी केली असता, पानशॉपमध्ये वेगवेगळ्या कंपनींचे अणि फ्लेवरचे सुमारे ४५ हजार रुपये किमतीचे ई-सिगरेट तसेच वेगवेगळ्या कंपन्यांची विदेशी सिगरेटची पाकीटे सापडली. त्यानंतर अंमली पदार्थ विरोधी पथकाने मिथलेश साहु याच्याविरोधात खारघर पोलीस ठाण्यात इलेक्ट्रॉनिक सिगरेट प्रतिबंध कायदा त्याचप्रमाणे कॉफ्टा कायद्यान्वये गुन्हा दाखल करून ई-सिगरेट आणि विदेशी सिगरेट जप्त केले.

## केंद्राप्रमाणेच राज्यात दिव्यांगाना वाहतूक भत्ता अनुज्ञेय

### -उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्र सरकारने दिव्यांग कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्ता ठरवून दिलेला आहे. त्याचप्रमाणे राज्य शासनाने राज्य शासकीय दिव्यांग कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्ता अनुज्ञेय केला आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत दिली. सदस्य निरंजन डावखरे यांनी प्रश्नोत्तराच्या तासात याबाबत प्रश्न उपस्थित केला होता.



उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सहाव्या आणि सातव्या वेतन आयोगानुसार आणि केंद्र सरकारच्या धर्तीवर राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्ता अनुज्ञेय करण्यात आला आहे. सातव्या वेतन आयोगानुसार दिव्यांग कर्मचाऱ्यांना शहरी भागाकरीता रुपये १०,८००, रुपये ५४००, रुपये २२५० आणि इतर ठिकाणांसाठी रुपये ५४००, रुपये २७०० आणि रुपये २२५० वाहतूक भत्ता अनुज्ञेय करण्यात आला आहे. हा भत्ता रुपये २२५० पेक्षा कमी असू नये, असेही तत्व केंद्र सरकारने ठरविले आहे. त्याप्रमाणेच राज्य शासनाची भूमिका असल्याचे ते म्हणाले.

## राज्यातील ३५० दुर्गांवरील माती आणि पाणी संकलित करून किल्ले रायगडावर जलाभिषेक

**महाड : प्रतिनिधी**

किल्ले रायगडावर पुढील वर्षी जून महिन्यात छ. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा वर्धापनदिनाला ३५० वर्ष पूर्ण होत असल्याने सशक्त भारत संघटनेकडून राज्यातील ३५० दुर्गांवरील माती आणि जल संकलित करून किल्ले रायगडावर आणले जाणार आहे. गेली कांही महिने सशक्त भारत संघटनेचे कार्यकर्ते अतोनात मेहनत घेत आहेत. महाड तालुक्यातील गडांवरील माती आणि जलाचे संकलन कांही दिवसांपासून संजय गायकवाड यांच्या माध्यमातून केले जात आहे. पुढील वर्षी होणाऱ्या शिवराज्याभिषेक दिनी या आणलेल्या जलाने श्री छत्रपतींच्या मूर्तीला जलाभिषेक केला जाणार आहे.

छ. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा ३५० वा वर्धापनदिन २ जून रोजी किल्ले रायगडावर साजरा होत आहे. ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी, श्रीराजाभिषेक शक ३५१ गुरुवार २० जून २०२४ रोजी तिथीप्रमाणे पुढील वर्षी ३५० वा वर्धापनदिन किल्ले रायगडावर भव्य दिव्या स्वरूपात साजरा केला जाणार आहे. याकरिता जय्यत तयारी सुरु असून सशक्त भारतकडून राज्यातील ३५० गडकिल्ल्यांवरील माती आणि पाणी संकलित करून किल्ले रायगडावर आणले जाणार आहे.



> **या वर्षी शिवराज्याभिषेकाचा ३५० वा वर्धापनदिन असला तरी पुढील वर्षी हा सोहळा किल्ले रायगडावर भव्य दिव्या स्वरूपात साजरा केला जाणार आहे. यावर्षी किल्ले रायगडावर या महोत्सवाचा प्रारंभ होणार आहे.**
> **- संजय गायकवाड, सशक्त भारत**

२०२४ मध्ये होणाऱ्या ३५० व्या राज्याभिषेक सोहळ्याचा प्रारंभ देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे करतील अशी माहिती संस्थेकडून देण्यात आलेल्या पत्रकात स्पष्ट केली आहे. ११ मार्च रोजी पुणे येथून या मोहिमेचा प्रारंभ झाला असून संजय गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली हे पथक विविध दुर्गांवर जावून माती आणि जल संकलित करत आहे. पुढील वर्षभरात विद्यालये, महाविद्यालय, देशाच्या कानाकोपऱ्यात जनजागृती केली जाणार आहे. व्याख्याने, चर्चासत्रे आदींच्या माध्यमातून हि जनजागृती केली जाणार असून देशाच्या चार टोकावरून स्वातंत्र्य प्रेरणा ज्योती किल्ले रायगडावर दाखल होत आहेत.

पुढील वर्षी ५ जून ते २० जून २०२३ या काळात मराठ्यांची दैदिप्यमान परंपरा १६ दिवसातून १६ भाषातून प्रबोधनाच्या माध्यमातून केली जाणार आहे. याबाबत माहिती देताना संजय गायकवाड यांनी सांगितले कि या मोहिमेचा प्रारंभ पुणे येथून श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीची आरती करून झाला आहे. संपूर्ण देशभरात हि जनजागृती केली जाणार असून पुढील वर्षी होणाऱ्या ३५० व्या राज्याभिषेकाच्या सोहळ्यास या वर्षभरात संकलित केले जाणारे जल किल्ले रायगडावर आणले जाणार असल्याचे सांगितले.

महाड तालुक्यातील किल्ले मंगळगड, सोनगड, चांभारगड, दौलतगड या गड किल्ल्यांची माती आणि पाणी संजय गायकवाड आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी संकलित केली. या मातीचे मणी करून त्यावर सोन्याचा लेप दिला जाणार आहे. या मण्यांची माळ केली जाणार असून संकलित केलेल्या जलाचा जलाभिषेक देखील केला जाणार आहे.

पान १ वरुन

## महाराष्ट्राची विकासात्मक वाटचाल

पाण्याचा तुटवडा होता. लातूरसारख्या ठिकाणी ट्रेनने पाणी न्यावे लागत होते. जलयुक्त शिवाराच्या माध्यमातून महाराष्ट्राने जी भूमिका स्वीकारली त्यामुळे अनेक गावे आता दुष्काळमुक्त झाली. महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्याचे एका अर्थाने आव्हान देवेंद्रजींनी स्वीकारलेले होते. त्या दुष्काळाला भूतकाळ करण्यासाठी पावले टाकायला महाराष्ट्राने सुरुवात केली. विजेचे भारनियमन होते. आज भारनियमनमुक्त अशा पद्धतीचा महाराष्ट्र आपल्याला पाहायला मिळतोय. मॅग्नेटिक महाराष्ट्राच्या माध्यमातून बेरोजगाराला चालना देण्याचे धोरण देवेंद्रजींनी स्वीकारले आणि गृहमंत्री म्हणून काम करीत असताना त्यांनी वेगवेगळ्या पद्धतीचे उपाययोजना करीत या महाराष्ट्रामधला कन्वेक्शन रेट वाढला पाहिजे, त्याच्यातून गुन्हेगारी संपेल, फॉरेन्सिक लॅब असतील त्याच्या माध्यमातून या महाराष्ट्रामध्ये गुन्हेगारी साबित करण्यासाठी पुढाकार घेतला आणि आता २०१९नंतर जरी अडीच वर्षे खंड पडला असला तरी आता पुन्हा नव्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून महाराष्ट्र दमदारपणाने पाऊल टाकत पुढे जाणार आहे आणि म्हणून आपण पाहतोय अनेक पावले या महाराष्ट्राच्या विकासासाठी त्यांनी उचललेली आहेत.

अनेक विषय सांगता येतील, पण माझ्या रायगड जिल्ह्याच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे म्हणजे मच्छीमारांसाठी जिथे प्रकल्पबाधित मच्छीमार आहे त्यांच्यासाठीचे एक धोरण पहिल्यांदाच देशामध्ये आणले जात आहेत आणि म्हणून मत्स्य विकासकोष याची स्थापना केली गेली. प्रत्येक प्रकल्पाच्या कॉस्ट आहे. प्रोजेक्ट कॉस्टच्या दोन टक्के किंवा ५० कोटी रुपये इतकी घसघशीत रक्कम दिली जाणार आहे. मी मागणी करीत आहे की यापुढच्या कालावधीमध्ये याची तरतूद होईल, पण आज या ठिकाणी ज्या प्रलंबित मागण्या आहेत. धरमतर खाडी मच्छीमारांनी मागणी केलेली आहे त्यांच्यासाठीसुद्धा या अशा पद्धतीची तरतूद लागू झाली पाहिजे. मच्छीमारांना सरसकट डिझेल अनुदान दिले जाणार आहे. पारंपरिक मच्छीमारांना पाच लाख रुपयांपर्यंतचा विमा दिला जाणार आहे त्याचे मी स्वागत करतो. पीक विम्याच्या बाबतीमध्ये तर संपूर्ण महाराष्ट्र स्वागत करेल की, संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनासुद्धा फायदा होणार आहे. अवकाळी पाऊस येतो, अतिवृष्टी होते. अशा वेळेला शासनाच्या माध्यमातून या पीक विम्यासाठीचा प्रीमियम भरला जाणार आहे याचे निश्चितपणाने सर्व शेतकरी स्वागत करीत आहेत.

सध्या सुरू असलेली हर घर जल ही जी योजना आहे याच्यामध्ये काही ठिकाणी योजनांच्या नियोजनामध्ये त्रुटी राहिल्या. २०२४पर्यंत या योजना पूर्ण करण्यासाठी पुढाकार घ्यायचा होता. अशा वेळेला काही ठिकाणी स्रोत आहेत त्या स्रोतांचा विचार न करताच त्या योजना अर्धवट आखल्या गेल्यात या पूर्णपणे आखल्या जाण्यासाठी यामध्ये ॲडिशन करण्याची आवश्यकता आहे आणि म्हणून यासाठी मी या ठिकाणी मागणी करतो की, यांचा विचार या अर्थसंकल्पाच्या माध्यमातूनदेखील झाला पाहिजे. महात्मा फुले जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून दीड लाखाऐवजी आता पाच लाखापर्यंतचे कव्हरेज दिले जाणार आहे. त्यामुळे मी विनंती करेन की, जनगणना न झाल्यामुळे अनेक या ठिकाणी परिस्थितीने गरीब आणि ज्यांना ज्यांना कव्हरेज मिळत नाहीत अशा कुटुंबांना या योजनेचा फायदा मिळण्यासाठी शासनाने पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. रायगड आणि ठाणे जिल्हा लोकसंख्येने मोठा आहे. अशा जिल्ह्यांना या ठिकाणी वेगवेगळ्या योजनांचा लाभ अधिक प्रमाणात मिळाला पाहिजे. तिथल्या लोकसंख्येला या योजनांचा फायदा झाला पाहिजे. मग हिंदूहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने आपला दवाखाना योजना आहे. या योजनेच्या माध्यमातून विनामूल्य चाचण्या चिकित्सा उपचार होणार आहेत. मग यामध्ये प्रत्येक तालुक्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी त्याचा लाभ मिळणार आहे, पण काही ठिकाणी तालुक्याच्या मुख्यालयाइतकेच महत्त्वाचे शहर आहे त्याही ठिकाणी या पद्धतीचे दवाखाने वाढीव स्वरूपात मिळाले पाहिजेत. विरार ते अलिबाग या मल्टीमॉडेल कॉरिडॉरची घोषणा केली गेली आहे. रेवस ते रेडी या सागरी महामार्गावरची घोषणा केली गेलेली आहे. मेट्रो मार्ग १२ की ज्यामध्ये कल्याण ते तळोजा या २०.७५ किलोमीटर लांबीच्या या ठिकाणी मेट्रो मार्ग होणार आहे. ५८६५ कोटी रुपये या मार्गासाठी दिले जाणार आहेत. रायगड जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी वेगवेगळ्या पद्धतीचे प्रकल्प येतात. आमच्या पनवेल, उरण तालुक्यामध्ये अनेक प्रकल्प येतात. अशा वेळेला या प्रकल्पांमुळे जे लोक प्रकल्पबाधित होणार आहेत त्यांना तिथे जो रोजगार निर्माण होतो. मग केंद्र शासनाचे प्रकल्प असतील किंवा राज्य सरकारचे प्रकल्प असतील यामध्ये त्या प्रकल्पबाधिताला विशेष स्थान मिळाले पाहिजे. त्या प्रकल्पबधिताला नोकरीच्या माध्यमातून त्या ठिकाणी सामावून घेतले पाहिजे, त्याचे पुनर्वसन झाले पाहिजे यासाठी अर्थसंकल्पाच्या माध्यमातून तरतूद झाली पाहिजे.

मी सरकारचे अभिनंदन करतो की, स्टार्टअपच्या साठीचे प्रकल्प आहेत त्याच्या निवासी प्रशिक्षण आणि संशोधनाची संस्था कळंबोली या ठिकाणी होणार आहे. अशाच पद्धतीने वेगवेगळ्या प्रकल्पांच्या प्रकल्पबाधितांना संरक्षण आणि तेही विशेषत्वाने रायगड जिल्ह्यामध्ये जे विशेष प्रकल्प येतात त्या अनुषंगाने चांगल्या पद्धतीचे कॉम्बिनेशन मिळावे आणि त्याचबरोबर त्यांना या व्यवसायामध्ये मोठ्या प्रकल्पात सामावून घेण्यासाठी पुढाकार घेतला जावा. अनेक चांगल्या चांगल्या गोष्टी या अर्थसंकल्पामध्ये होतात. त्यामुळे या अर्थसंकल्पाचे पुन्हा एकदा मी या ठिकाणी स्वागत करून मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री महोदयांचे अभिनंदन करतो, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी नमूद करीत रायगड जिल्ह्यातील नागरिकांना जास्तीत जास्त सेवा मिळण्याच्या दृष्टिकोनातून सभागृहात मागणी केली.

## ई-रिक्षासाठी माथेरान बंद; अधीक्षक कार्यालयावर मोर्चा

भरउन्हात विविध पक्षांचे प्रमुख नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते मोर्चात सहभागी झाले होते. महिलांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती. त्याचप्रमाणे शालेय विद्यार्थीदेखील होते. या वेळी अधीक्षक दीक्षांत देशपांडे आणि मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांना मागणीचे निवेदन देण्यात आले.

**आजच्या मोर्चाबद्दल वरिष्ठांना कळविणार आहोत. पुढील काळात माथेरानच्या हिताचे निर्णय होतील अशी अपेक्षा आहे. ई-रिक्षा प्रोजेक्टमध्ये नगर परिषदेने आपल्या परीने उत्तम भूमिका बजावलेली आहे.**

**-सुरेखा भणगे, मुख्याधिकारी**

## उरण मतदारसंघासाठी १४७.५० कोटी रुपयांचा निधी मंजूर

मागील दोन टर्मच्या तत्कालीन आमदारांकडून कोन-सावळे रस्ता खड्ड्यात गेला होता. कार्यतत्पर आमदार महेश बालदी यांनी तत्काळ या विषयात लक्ष देऊन प्रश्न मार्गी लावला. आता दांड-तुराडे रस्त्याचाही विकास होणार आहे. त्यामुळे प्रवासी, वाहनचालकांना मोठा दिलासा मिळून इंधनाचीही बचत होणार आहे.


महाराष्ट्र शासनाचा भुषण पुरस्कार प्राप्त

ISO 9001-2015

**आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्या. अलिबाग.**

नोंदणी क्र : आरजीडी/एबीजी/आरएसआर/३३८/९८/९९/ दि. ०४-०९-१९९८

आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्या, अलिबाग या संस्थेच्या पेण व उरण शाखेकरीता स्वमालकीच्या जागेमध्ये सिव्हील वर्क / इंटेरिअर कामाचे क्षेत्रांतील खालील स्वरूपाची कामे करणा-या मान्यवर व अनुभवी कॉन्ट्रॅक्टर्स / सहकारी संस्था यांचेकडून प्रकारनिहाय, स्वतंत्र माल मजूरीसह निविदा मागविणेत येत आहेत. निविदा अर्ज संस्थेत उपलब्ध आहेत, त्याची प्रती अर्ज किंमत रुपये १०००/- (अक्षरी रूपये एक हजार मात्र) असून आपल्या निविदा संस्थेत दाखल करतांनाच रू.२०,०००/- (अक्षरी रूपये वीस हजार मात्र) रोखीने अथवा डीडी स्वरूपात अनामत रक्कम जमा करावे लागतील.

पेण नगरपरिषद हद्दीत असलेल्या पेण शाखेच्या पहिल्या मजल्यावरील जागा अंदाजे ७२६ चौ.फुट कारपेट क्षेत्रफळ व उरण नगरपरिषद हदिदत असलेल्या उरण शाखेच्या श्री प्रेरणा हाउसिंग सोसायटी मधिल तळमजल्यावरील गाळा क्र.०१ जागा अंदाजे ४७.१७ चौ. मीटर कारपेट क्षेत्रफळ असलेल्या शाखेच्या जागेमध्ये खालील प्रकारची कामे करणे.

| अ.नं. | कामाचे नांव व प्रकार |
|---|---|
| १. | सिव्हील वर्क |
| २. | ॲल्युमिनीयम विंडो |
| ३. | फर्निचर |
| ४. | पिओपी फॉल सिलिंग |
| ५. | इलेक्ट्रीकल वर्क |
| ६. | नामफलक |
| ७. | इलेक्ट्रीकल फिक्चर |
| ८. | प्लंबिंग वर्क |
| ९. | रंगकाम |
| १०. | वर नमूद केल्याप्रमाणे व त्या अनुषंगाने येणारी इतर कामे |

वरील कामाच्या निविदा संस्थेच्या मुख्य कार्यालय आदर्श भवन, श्रीबाग नं. ३, भाऊ जगे उद्यानासमोर, अलिबाग येथे दिनांक २३.०३.२०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत खाली सही करणारे स्वाक्षरीकार यांचे नावाने सादर करावयात. याबाबत अधिक माहिती संस्थेच्या मुख्य कार्यालयात मिळेल.

कोणतेही कारण न देता कमी अगर जास्त दराची, कोणतीही अथवा सर्व निविदा अगर निविदेमधील कोणताही आयटम अगर आयटेमस् कोणत्याही कारणाशिवाय स्विकारणे अथवा नाकारणेचा हक्क संस्थेने राखून ठेवला आहे. मुदतीनंतर आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

**मुख्य कार्यालय, अलिबाग**
**दि. १५.०३.२०२३**

**सही/-**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# उरणमध्ये अवकाळी पावसामुळे नुकसान

## काही काळ बत्ती गूल; नागरिकांची धावपळ

**उरण : वार्ताहर**

चिरनेर पूर्व विभागात गुरुवारी (दि. १६) रात्री सायंकाळच्या सुमारास अवकाळी पाऊस बरसायला सुरुवात झाली. जवळजवळ एक तासभर पाऊस पडल्याने येथील शेतकरी वर्गासह आंबा बागायतदार व वीट कारखानदारांचे फार नुकसान झाले आहे.



या अवकाळी पावसामुळे वीज गायब झाल्यामुळे येथील जनतेला तीन तास अंधारात काढावे लागले. आंबा बागायतदारांची पुरती वाट लागली आहे. संपूर्ण आंब्याच्या बागा या मोहरांच्या पिवळ्या रंगाने बहरल्या होत्या, मात्र काही दिवसांपासून सुरू झालेले ढगाळ वातावरण व आता दोन वेळा पडलेला अवकाळी पाऊस यामुळे आंबा पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. ढगाळ वातावरण व अवकाळी पावसामुळे मोहोरांनी पिवळ्या दिसणाऱ्या आंबा बागा काळ्या पडल्या आहेत. मोहोराने बहरलेली आंब्यांची झाडे मोहोर आणि कैऱ्या गळून पडल्यामुळे आता ही झाडे रिकामी झाली आहेत. आंबा बागेत मोहराच्या पाकळ्यांचा व कैऱ्यांचा गळून खच पडला आहे. आंबा बागेची साफसफाई, सेंद्रिय खते, महागड्या औषधांची फवारणी व बागेची राखण ही सर्व मेहनत आणि झालेला सर्व खर्च वाया गेला असल्याचे येथील आंबा बागायतदार अस्मित ठाकूर यांनी सांगितले.

या भागातील वीट कारखानदारांचेदेखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. वीट कारखानदार गोकुळ परदेशी यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी यावर्षी पडलेल्या अवकाळी पावसामुळे विटांचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याचे सांगितले. माती, कोळसा, मजूर या आता परवडणाऱ्या गोष्टी राहिल्या नाहीत, पण आता कुठलाच व्यवसाय राहिला नसल्याने आम्ही हा व्यवसाय करीत आहोत, पण नैसर्गिक संकटामुळे हा ही आमचा विटांचा व्यवसाय धोक्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले.

दुग्धउत्पादक शेतकरीदेखील या अवकाळी पावसाच्या संकटात सापडले आहेत. त्यांनी गुरांसाठी राखून ठेवलेला पेंढा भिजून गेला आहे. त्यामुळे पेंढ्याची वैरण काळी पडण्याची शक्यता वर्तविली जात आहे. शेतकऱ्यांनी शेतात अंथरून ठेवलेले पाळापाचोळ्याचे राब भिजून गेले आहेत. त्याचबरोबर शेतकऱ्यांनी गोळा करून ठेवलेला सुका लाकूडफाटाही भिजला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसह इतर व्यावसायिकांमध्येही चिंतेचे वातावरण पसरले आहे.

## वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर पनवेलमध्ये कारवाई



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल वाहतूक शाखेने वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तसेच विनाहेल्मेट दुचाकी चालविणाऱ्या, सीटबेल्ट न लावणाऱ्या चालकांविरोधात जोरदार कारवाईला सुरुवात केली आहे.

पनवेल वाहतूक शाखेने जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरील पनवेल येथील कोळखे गांव येथील ब्लॅक स्पॉटवर वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ५३ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांच्याकडून २३ हजार ७०० रुपयांचा दंड वसूल केला.

या वेळी वाहतूक पोलिसांनी वाहतुकीचे नियम पाळा, कारावई टाळा असा संदेश देखील वाहन चालकांना दिला, तसेच पनवेल शहर वाहतूक शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक संजय नाळे यांनी देखील कोळखे गांव येथील रस्त्यावर वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांवर कारवाई केली आहे. त्यांनी वाहन चालकांना वाहतुकीचे नियम पाळण्याचे आवाहनसुद्धा केले आहे.

## कामोठ्यात पोलीस पत्नीचे दीड लाखांचे दागिने लुटले

**पनवेल : वार्ताहर**

चेन स्नॅचिंग करणाऱ्या लुटारुंनी पोलीस पत्नी असलेल्या शिक्षिकेच्या गळ्यातील तब्बल एक लाख ६० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने लुटून नेल्याची घटना कामोठे सेक्टर-३६मध्ये बुधवारी (दि. १५) सकाळी घडली. कामोठे पोलिसांनी या प्रकरणी दोघा अज्ञात लुटारूविरोधात चोरीचा गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

तक्रारदार या कामोठे सेक्टर-३५ मध्ये राहण्यास असून त्या मुंबईत बीएमसीच्या शाळेत शिक्षिका आहेत, तर त्यांचे पती हे मुंबई पोलीस दलात हवालदार म्हणून कार्यरत आहेत. या शिक्षिका रोज सकाळी आपल्या पतीसह मॉर्निंग वॉकसाठी जात असतात. बुधवारी सकाळी ६ वाजता त्या आपल्या पतीसह नेहमीप्रमाणे मॉर्निंग वॉकसाठी गेल्या होत्या. सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास त्या सेक्टर-३६मधील भूमी टॉवर इमारतीजवळ आल्या असताना, समोरून एक स्कूलबस आल्याने त्या बाजूला उभ्या राहिल्या. याचवेळी त्यांच्या समोरुन विरुद्ध दिशेने दुचाकीवरून आलेल्या दोघा लुटारुंपैकी पाठीमागे बसलेल्या लुटारुने या शिक्षिकेच्या गळ्यावर जोरात हात मारून त्यांच्या गळ्यातील ६० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसूत्र व एक लाख रुपये किंमतीची सोन्याची चेन खेचून शिवसेना चौकाच्या दिशेने पळून गेले.

गुन्हे

शिक्षिकेने आरडाओरड केली, मात्र तोपर्यंत लुटारु पसार झाले. त्यामुळे या शिक्षिकेने पतीसह कामोठे पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली.

## 'एसबीआय'कडून पनवेल महापालिकेला रुग्णवाहिका

**पनवेल : प्रतिनिधी, वार्ताहर**

एसबीआय बँकेच्या २०२३च्या सीएसआर फंडातून महापालिकेस 'बेसिक लाईफ सपोर्ट' रुग्णवाहिका देण्यात आली. या रुग्णवाहिकेचा पालिका कार्यक्षेत्रातील रुग्णांसाठी उपयोग होणार आहे. या हस्तांतरणाच्या कार्यक्रमाला एसबीआय बँकेचे मुंबई मेट्रो सर्कल नेटवर्क आयचे जनरल मॅनेजर मनोजकुमार सिन्हा यांनी आयुक्त गणेश देशमुख यांना प्रतिकात्मक किल्ली देऊ केली.



या वेळी उपायुक्त सचिन पवार, मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, मुख्य लेखा अधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, डेप्युटी मॅनेजर ईस्ट झोन सनातन मिश्रा, रिजनल मॅनेजर धर्मेंद्रकुमार सिंग, चीफ मॅनेजर अमितकुमार, लेखा परिक्षक विनयकुमार पाटील, वाहन विभाग प्रमुख राजेश डोंगरे उपस्थित होते.

पनवेल महानगरपालिकेने नागरिकांचे आरोग्य उत्तम राहण्यावरती कायमच भर दिला आहे. महापालिकेकडे सध्या सात रुग्णवाहिका असून एक शववाहिका आहे. एसबीआय बँकेकडून मिळालेली रुग्णवाहिकेमुळे या संख्येत वाढ झाली आहे.

महापालिकेच्या खारघर, कामोठे, पनवेल, कळंबोली या चारही प्रभागामध्ये रुगणसेवेसाठी या रुग्णवाहिकांचा उपायोग होत असतो. याबरोबरच येत्या काळात महापालिका राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत ५० खाटांचे दोन शहरी समुदाय आरोग्य केंद्र तसेच ५० खाटांचे सुसज्ज माता- बाल संगोपन केंद्र उभारणीचे काम पालिका हाती घेणार आहे. यासाठीही या रुग्णवाहिकांचा उपयोग होणार आहे.

## कुत्र्याच्या पिल्लाला क्रूर वागणूक

### सुरक्षारक्षकांविरुद्ध गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

नऊ महिन्यांच्या कुत्र्याच्या पिल्लाला क्रूर वागणूक देत त्याला मारून निर्जन ठिकाणी टाकल्याचा सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओची व्हाईस ऑफ सिटीझन या प्राणीप्रेमी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी गंभीर दखल घेतली आहे, तसेच या कुत्र्याच्या पिल्लाला क्रूर वागणूक देणाऱ्या पनवेलमधील सुरक्षारक्षकांविरोधात तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

तक्रारदार मिथीला नाडकर्णी (वय ४३) या व्हाईस ऑफ सिटीझन या संस्थेच्या सदस्या असून त्या कामोठे भागात राहण्यास आहेत. त्यांची संस्था प्राणीप्रेमी असून प्राण्यांना क्रूर वागणूक देणाऱ्या व्यक्तींविरोधात कायदेशीर कारवाई करते.

गुरुवारी या संस्थेच्या व्हॉटस्अ‍ॅप ग्रुपवर एका नऊ महिन्यांच्या कुत्र्याच्या पिल्लाला मारुन त्याला एका गोणीतून अज्ञात ठिकाणी टाकून दिल्याचा व्हिडीओ एका सदस्याने टाकला होता. त्यामुळे या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सदर व्हिडीओबाबत अधिक माहिती घेतली असता, हा व्हिडीओ पनवेलमधील अमेटी विद्यापीठातील सुरक्षारक्षकांचा असल्याची त्यांना माहिती मिळाली. त्यानंतर व्हाईस ऑफ सिटीझन या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी या प्रकाराची गंभीर दखल घेऊन तत्काळ तालुका पोलीस ठाण्यात कुत्र्याला क्रूर वागणूक देऊन मारणाऱ्या सुरक्षारक्षकांविरोधात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी सुरक्षारक्षक अजय गुप्ता, लक्ष्मण चौगुले आणि इतर सुरक्षारक्षकांविरोधात प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियमासह इतर कलमानुसार गुन्हा दाखल केला आहे, तसेच पुढील कार्यवाहीला सुरुवात केली आहे.

## जेएनपीए कामगार विविध मागण्यांसाठी एकवटले

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

जेएनपीए बंदरातील भारतीय मजदूर संघाच्या नेतृत्वातील संघटना शुक्रवारी (दि. १७) सकाळी कामगारांच्या विविध मागण्यांसाठी एकवटले होते. कामगारांच्या मागण्यांवर व्यवस्थापनाने चर्चा करून आश्वासन दिले.

जनरल कामगार युनियन व जेएनपीए वर्कर्स युनियन यांनी कायमस्वरूपी व कंत्राटी कामगारांच्या मागण्यांसाठी एकवटले होते. कामगारांचा नवीन वेतन करार करा, कंत्राटी कामगारांच्या मंजूर थकीत रकमा त्वरीत द्या, स्वेच्छा निवृत्तीनंतर बंदरात शिल्लक कामगारांच्या रोजगार सुरक्षेसाठी त्रिपक्षीय करार करा, निवृत्त कामगारांवर अवलंबून असलेल्याला वैद्यकीय सुविधा सुरू करा, मृत कामगारांच्या वारसांना कायमस्वरूपी नोकरी मिळेपर्यंत कंत्राटी काम द्या, कंत्राटी कामगारांना ६० वर्षे वयोमर्यादा, ग्रॅज्युईटी, आरोग्य विमा आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

या निदर्शनाचे नेतृत्व कामगार नेते सुरेश पाटील, जेएनपीए विश्वस्त रविंद्र पाटील, सुधीर घरत यांनी केले, तर कामगारांच्या मागण्यांसंदर्भात जेएनपीएचे मुख्य सचिव व व्यवस्थापक जयवंत ढवळे व मनिषा जाधव यांनी चर्चा करून आश्वासन दिले.

## वाहतूक पोलिसांची सतर्कता

### घरातून पळून जाणाऱ्या मुलाला दिले कुटूंबीयांच्या ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील मुंबई-पुणे महामार्गावरून एक मुलगा परवानगी नसतानाही त्याची दुचाकी घेऊन प्रवास करीत होता. त्यावेळी पेट्रोलिंग करीत असलेल्या वाहतूक पोलिसांच्या तो निदर्शनास आल्याने त्याला त्यांनी त्वरीत थांबविले. महामार्ग पोलीस केंद्र पळस्पे येथे आणून त्याची चौकशी केली असता, तो घरच्यांना न सांगता घरातून पळून जात असल्याचे त्यांनी सांगितले. या वेळी त्याची चौकशी करून त्याच्या कुटूंबीयांची माहिती घेतली व त्यांच्याशी संपर्क साधून पोलिसांनी त्यांना बोलवून त्या मुलाला त्यांच्याकडे सुपूर्द केले.



मुंबई-पुणे एक्स्प्रेस हायवेवर पोलीस उपनिरीक्षक बुरकुल व महामार्ग पोलीस केंद्र पळस्पे मोबाईलवरील अंमलदार भगत, जाधव, अवतार हे नेहमीप्रमाणे पेट्रोलिंग करीत होते. त्यावेळी सुझुकी एक्सेस दुचाकी (क्र. एमएच १४ ईडी ०३९३) वरील चालक आदर्श किरण तोरकडी (रा. काव्यधारा सोसायटी, कोळशेत, ठाणे (प)) हा द्रुतगती महामार्गावर दुचाकीला परवानगी नसताना त्याच्या ताब्यातील गाडी घेऊन चालला होता.

त्याला पोलिसांनी थांबवण्याचा इशारा केला असता तो न थांबता पळू लागल्याने त्यांना संशय आला व किमी नं. ७ चिखले गाव, येथे ताबडतोब थांबविले. लायसन्सची व गाडीच्या कागदपत्रांची तपासणी केली असता या दुचाकीची समर्पक माहिती देऊ तो शकला नाही. त्यामुळे त्याला दुचाकीसह ताब्यात घेऊन महामार्ग पोलीस केंद्र पळस्पे येथे नेण्यात आले. त्यानंतर मुलाची मानसिक परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन सामंजस्याने त्याचेकडून त्याचे वडीलांचा फोन नं. प्राप्त करून त्यांच्याशी फोनद्वारे संपर्क करून अधिक चौकशी केली.

हा मुलगा त्याचे आई-वडिलांना न सांगता घरातून घाबरून पळून निघून आला होता. त्याबाबत त्याने त्याच्या घरी एक चिठ्ठी लिहून ठेवली होती व तो हरवलेला आहे, असे सांगितले.

पोलिसांनी त्याचे वडील किरण तोरकडी यांच्याशी संपर्क साधून त्याला त्यांच्या ताब्यात दिले. पोलिसांच्या सतर्कतेमुळे या मुलाचा शोध लागण्यास मदत झाली.

## युवा केंद्र संघटनातर्फे युवा संवाद-भारत २०४७ कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या अमृत महोत्सवानिमित्त अमृत काळातील भारत २०४७ची झलक या संदर्भात युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालय आणि त्यांची स्वायत्त संस्था नेहरू युवा केंद्र संघटन १ एप्रिल ते ३१ मे २०२३ या कालावधीत देशभरातील सर्व जिल्ह्यांमध्ये समुदाय आधारित संस्था युवा संवाद-भारत २०४७ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम टाऊन हॉल स्वरूपात आयोजित केला जाईल, ज्यामध्ये तज्ज्ञ व्यक्ती सहभागी असतील. जे पंच-प्राण-मंत्र यावर चर्चा करतील आणि त्यानंतर किमान ५०० तरुणांच्या सहभागासह प्रश्नोत्तरे एक सत्र होईल. आयोजक समुदाय आधारित संस्थेला कार्यक्रम आयोजित करण्यासाठी २० हजारापर्यंत प्रतिपूर्ती केली जाईल. ज्या समुदाय आधारित संस्था अर्ज करू इच्छितात, त्यांचा राजकीय नसलेला इतिहास असणे आवश्यक आहे आणि युवा संवाद कार्यक्रम आयोजित करण्यासाठी पुरेसे संघटनात्मक बळ असायला हवे. संस्थेविरुद्ध कोणताही फौजदारी खटला प्रलंबित नसावा. कार्यक्रमासाठी जिल्ह्यातील जास्तीत जास्त तीन समुदाय आधारित संस्था निवडल्या जातील. इच्छुक संस्थांनी नेहरू युवा केंद्र सार्थक बंगला, श्रीबाग नं. २ येथे अर्ज सादर करावेत. अधिक माहितीसाठी qnykalibaggmail.com या ई-मेलवर किंवा मो.९६३४२४३०७५वर संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

## पाले राजिप शाळेत भरला आनंद बाजार

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील पाले राजिप शाळेत विद्यार्थ्यांसाठी आनंद बाजार भरविण्यात आला होता. शाळेचे मुख्याध्यापक उपेंद्र ठाकूर, उपशिक्षिका पुष्पलता म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली व शाळा व्यवस्थापन कमिटीच्या सहकार्याने शाळेत विविध उपक्रम राबविले जातात.



या पाले शाळेला गणिताचे गाव म्हणून चर्चा आहे. त्यात आज सर्वांच्या सहकार्याने मुलांना लहान वयात व्यावसायिक ज्ञान मिळावे आणि सहज आकडेमोड करता यावी यासाठी आनंदबाजाराचे आयोजन करण्यात आले. या वेळी आवरे ग्रुप ग्रामपंचायत उपसरपंच समाधान म्हात्रे, प्रथम एज्युकेशन फाउंडेशनच्या उरण तालुका प्रमुख रणिता ठाकूर, शाळेचे मुख्याध्यापक उपेंद्र ठाकूर, पुष्पलता म्हात्रे, सारडे विकास मंचचे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते.

या आठवडा बाजारात ज्याप्रमाणे आपल्या दैनंदिन जीवनात जसा बाजार भरला जातो, तसाच काहिसा देखावा पहायला मिळाला. या बाजारात शेवपुरी, चिकन पुरी, चिकन भाकरी, कपडे, लिंबू सरबत, वडापाव, इडली अशा विविध प्रकारची दुकाने विद्यार्थ्यांनी मांडली होती. या वेळी ग्रामस्थांनी खरेदी करून मुलांना शिक्षणासोबत आर्थिक व्यवहार कसा करता यावा, यासाठी सर्वांनी सहकार्य केले. या आनंद बाजारात ज्यांनी सहकार्य केले त्या सर्वांचे शाळेचे मुख्याध्यापक उपेंद्र ठाकूर, पुष्पलता म्हात्रे यांनी आभार मानले.

## जादूगार हांडे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक्सलन्स अवॉर्ड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ज्येष्ठ जादूगार, सामाजिक कार्यकर्ते पी. बी. हांडे यांना नवी दिल्ली येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक्सलन्स अवॉर्ड २०२३ने मंत्री बबनराव घोलप यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले.



जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जादूगार हांडे हे गेली ३५ वर्षे सामाजिक क्षेत्रात काम करीत आहेत. अंधश्रद्धा निर्मूलनपर सप्रयोग व्याख्याने देतात महाराष्ट्रात ८४५ व्याख्याने दिली आहेत. जादूची दुनिया या जादू कार्यक्रमाद्वारे सामाजिक संस्थांना कार्यक्रमाद्वारे आर्थिक मदत मिळवून दिली आहे. स्वतःच्या जादूगार पी. बी. हांडे सोशल फाउंडेशन सामाजिक संस्थेद्वारे गरजू विद्यार्थी, नागरिकांना मदत करतात. विद्यार्थ्यांचा तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान करून प्रोत्साहित करतात. महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबवितात.

अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी, परंपरा यापासून समाजमुक्त व्हावा सोशन थांबावे म्हणून सतत प्रबोधन करतात. ते संपादन करीत असलेल्या लोकसारखी मासिकातून समाज प्रबोधन करतात. त्यांनी राष्ट्रीय एकात्मतेसाठी केलेल्या खोपोली ते पनवेल ३६ किमी. डोळ्यावर पट्टी बांधून दुचाकी चालविण्याच्या धाडसी प्रवासाची जागतिक विक्रमात नोंद झाली आहे. साहित्यिक कवयित्री पत्नी मंदाकिनी हांडे यांचे त्यांच्या कार्यात मोलाची साथ असते.

## संपादकीय

# निसर्गाची अवकृपा

राज्यात पुन्हा एकदा अवकाळी पाऊस सक्रिय झाला आहे. गेल्या काही दिवसांपासून होत असलेल्या पाऊस आणि गारपिटीमुळे रब्बी पिकांना फटका बसला आहे. परिणामी शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. निसर्गाची अवकृपा आणखी काही दिवस राहणार असल्याचा हवामान खात्याचा अंदाज आहे. सुदैवाने राज्यात शेतकरीहितैषी सरकार असल्याने वेळच्या वेळी मदत मिळत आहे.

**हल्ली अवकाळी पाऊस सर्वांना नियमितच वाटू लागला आहे, कारण वर्षभर वरुणराजा कधी ना कधी, कुठे ना कुठे पडतच असतो. पूर्वी तो पावसाळ्यानंतर कधी तरी हिवाळ्यात हजेरी लावत असे. आता त्याने उन्हाळ्यातही वरचेवर वर्दी देण्यास सुरुवात केली आहे, पण त्याच्या या अवचितपणे येण्याने सारे काही बिघडत आहे. वास्तविक पावसाच्या पाण्यावरच पुढील वर्षभराचे नियोजन केले जात असते. विशेषकरून शेतकरी आपले नियोजन करीत असतो, ते पावसाळ्यातील सरासरी पावसाचे गणित पकडून. अवेळी आलेला पाऊस मात्र बळीराजाच्या संपूर्ण कष्टावर पाणी फिरवित आहे. बागायतदार, वीटभट्टी व्यावसायिकांनाही 'अवकाळी'चा फटका बसतोय. त्यामुळे करायचे तरी काय असा यक्षप्रश्न त्यांना पडतो. फरक फक्त एवढाच आहे की, याआधी एखादी नैसर्गिक आपत्ती आली की नुसत्या घोषणा व्हायच्या. आपत्तीग्रस्तांच्या पदरात मात्र निराशेपोटी काहीएक येत नसे. मधल्या मध्येच अर्थसहाय्य गिळंकृत केले जाई. आता मात्र बाधितांना पारदर्शकपणे भरपाई मिळते. शेतकऱ्यांकडे तर शिंदे-फडणवीस सरकारने विशेष लक्ष दिले आहे. विविध योजना लागू केल्या आहेत. केंद्र सरकारच्या पंतप्रधान किसान सन्मान योजनेच्या धर्तीवर राज्यात नमो शेतकरी महासन्मान निधी योजना नुकत्याच सादर झालेल्या अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आली आहे. याबाबत माहिती देताना उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, योजनेनुसार प्रति शेतकरी प्रतिवर्ष सहा हजार रुपये राज्य सरकार देणार आहेत. म्हणजेच केंद्राचे सहा हजार आणि राज्याचे सहा हजार असे एकूण १२ हजार शेतकऱ्याच्या बँक खात्यात जमा होतील. याशिवाय राज्यातील शेतकऱ्यांना आता केवळ एक रुपयात पीकविमा काढता येणार आहे. आधीच्या योजनेत विमा हप्त्याच्या दोन टक्के रक्कम शेतकऱ्याकडून घेतली जायची. आता शेतकऱ्यांवर कोणताही करभरणा नसेल. राज्य सरकार हप्ता भरणार असून केवळ एक रुपयात शेतकऱ्याला पीकविमा काढता येईल. शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी महाकृषिविकास अभियान राबविण्यात येणार आहे. मागेल त्याला शेततळे योजनेचा आता व्यापक विस्तार केला जाणार आहे. नैसर्गिक शेतीलालाही प्रोत्साहन दिले जाणार आहे. राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी योजनांचे लाभ मिळत आहेत. २०१७च्या छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेतील उर्वरित पात्र शेतकऱ्यांना योजनेचा लाभ दिला जाणार आहे. महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील लाभ या सरकारने दिला. विशेष म्हणजे अवकाळी पावसामुळे होणाऱ्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून वेळच्या वेळी भरपाई दिली जात आहे. कालच कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी राज्यात अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पीकविम्याचे पैसे ३१ मेपर्यंत देणार असल्याची घोषणा केली, तर आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही आमचे सरकार शेतकऱ्यांचे असून त्यांना वाऱ्यावर सोडणार नाही, अशा शब्दांत सभागृहात ग्वाही दिली. एकूणच संकटे येत असली तरी सरकार खंबीर असून ते जनतेच्या, शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे हे दिसून येते.**

# सुधागडात प्राचीन लेण्यांचा वैशिष्ट्यपूर्ण ठेवा



**खबरबात**
धम्मशील सावंत

सुधागड तालुक्यात प्राचीन व भव्य लेण्यांचे समूह आढळतात. निसर्गाच्या कुशीत वसलेल्या या प्राचीन बौद्धकालीन लेण्या वैशिष्ट्यपूर्ण आहेत. येथील ठाणाळे, नेणवली, गोमाशी व चांभार लेणी अशा भव्य लेण्यांचा समूह आहे. प्राचीन व मौलिक इतिहासाची भरभक्कम साक्ष देणाऱ्या या वास्तू इतिहास अभ्यासक व देश विदेशातील पर्यटकांच्या पसंतीच्या ठरतात, मात्र त्यांचे सुव्यवस्थित जतन व संगोपन होण्याची अतिशय आवश्यकता आहे.

**ठाणाळे लेणी** : ठाणाळे लेणी समुहात चैत्यगृह, स्मारक, स्तूपसमूह, सभागृह व उर्वरित २१ विहार लेणी आहे. बहुतांश विहारांमध्ये व्हरांडे आणि एक किंवा दोन खोल्या असून त्यामध्ये शयनासाठी ओटे आहेत. काही विहारांमध्ये समोरच्या भागात दालन व चार पाच भिक्षूंच्या निवासाची व्यवस्था आहे. अशा विहारात आंतरदालन, प्रवेशद्वार, खिडकी व शयन ओटे आहेत. पाच पायऱ्या असलेल्या एका विहारात वाकाटककालिन रंगीत चित्रांचे काही अवशेष दिसतात. प्राकृत ब्राम्ही लिपीतील शिलालेख असलेले एक पाण्याचे टाके आहे. पाण्याचे हौद, टाके, ब्राम्ही शिलालेख भित्तीचित्र आहेत. या सर्वांची मोठ्या प्रमाणात पडझड झाली आहे. बरेच अवशेष भग्नावस्थेत आहेत. अनेक उपद्रवी लोकांनी येथील स्तूप, चैत्यगृह, स्मारक यावर चुन्याने व ऑईल पेन्टने आपली नावे लिहिली आहेत. त्यामुळे या ऐतिहासिक वास्तूंचे सौंदर्य लुप्त झाले आहे. ठाणाळे लेण्यांसारखा ऐतिहासिक व पुरातन ठेवा जतन करण्यासाठी प्रशासनाकडून विशेष व प्रभावी उपाययोजना राबविण्यात यावी, अशी मागणी पर्यटकप्रेमी व लेणीप्रेमी यांनी केली आहे.

ठाणाळे लेण्यांचा काळ हा इसवी सनपूर्व दुसऱ्या शतकापासून इसवी सन पाचव्या शतकापर्यंत आहे. ही लेणी डोंगरामध्ये पश्चिमाभिमुख कोरलेली आहेत. लेण्यात सापडलेल्या विविध वस्तू व मौर्यकालीन चांदीची नाणी पाहता ही लेणी २२०० वर्षांपूर्वीची असल्याचे अनुमान काढण्यात येतो. लेण्यांचा दगड हा बेसाल्ट दगड आहे. शिल्पकलेच्या दृष्टीने अप्रतीम असलेल्या तसेच मानवी जीवनाच्या आर्थिक जडणघडणीत या लेण्यांनी महत्वाची भूमिका बजावली आहे. ही लेणी समुद्रकिनाऱ्यावरून चौल-धरमतर-नागोठणे खाडीमार्गे देशावर जाणारी व्यापारी केंद्रे होती, असे म्हटले जाते. वाघजाई, घाटातून मावळात जाणारा प्राचीन मार्गही या लेण्यांजवळून जातो. यामुळे ही लेणी चौल बंदराच्या सान्निध्याने खोदली गेली आहेत. कोकणातून घाटमार्गे देशावर जात-येतांना विश्रांतीचे स्थान म्हणून या लेण्यांचा उपयोग केला गेला. त्याचबरोबर बौद्धभिक्षूंच्या भदन्त, आचार्य, परित्राजक यांच्या निवार्यासाठी सुद्धा या लेण्यांचा उपयोग इ. स. पाचव्या शतकापर्यंत करण्यात आला आहे.

या लेण्या अतिशय प्राचिन असून ऐतिहासिकदृष्ट्या खूप महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे पुरातत्व खात्याने वेळीच या लेण्यांची डागडुजी व देखभाल करणे गरजेचे आहे. येथे येणाऱ्या पर्यटकांनी लेण्यांवर नावे टाकून येथील सौंदर्याला गालबोट न लावता, येथील परिसर साफ व संरक्षित कसा राहिल याची दक्षता घेतली पाहिजे, असे आवाहन शिवऋण प्रतिष्ठानने केले आहे. शिवऋण प्रतिष्ठानतर्फे येथील परिसर साफ करून त्यासंदर्भातील लघुपटही प्रसिद्ध केला आहे.

**ठाणाळे लेण्यांपर्यंत कसे पोहचाल?**

पालीपासून ठाणाळे हे गाव १५ किमी अंतरावर आहे. ठाणाळे या गावी येण्यासाठी नाडसूरपर्यंत एसटीची सुविधा उपलब्ध आहे. नाडसूर ते ठाणाळे हे दोन किमी. अंतर असून तेवढेच अंतर लेण्याकडे जाण्यासाठी चालावे लागते. ठाणाळे गावच्या पूर्वेकडे असलेल्या जंगलामध्ये ही लेणी आहेत. त्या भागाला चिवरदांड असे म्हणतात. क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके यांनी ही येथे आश्रय घेतला होता.

**नेणवली व चांभार लेणी** : खडसांबळे व नेणवली गावाजवळ सह्याद्री पर्वतात नेणवली लेण्या आहेत. लेण्याचा मार्ग या दोन्ही गावापासून खरबाच्या वाटेने घनदाट अशा लेण्या डोंगरांमध्ये जातो लेणी गावापासून साधारण अडीच किमी अंतरावर आहेत व येथील जंगल राखीव वनक्षेत्र आहे. अतिशय दुर्गम असलेल्या या लेणी समुहात एकूण २१ लेण्या आहेत. काही लोक पूर्वापार या लेण्यांना पांडवलेणी म्हणूनच संभवतात.

लेण्यांतील सर्वात मोठ्या सभागृहाच्या मागच्या बाजूस उंच व मोठा घुमट आहे. घुमट दगडांमध्ये व्यवस्थित कोरला आहे. घुमटचा व्यास १.५ मीटर उंची ३.५ मीटर आहे. घुमटाच्या अगदी वर मध्यभागी झाकणासारखा आकार असून चौरसाकृती छिद्र आहे. स्थानिक लोक या घुमटाला रांजण म्हणतात. या लेण्यातील सभागृहे सर्वांत मोठी लेणी आहे. याचा दर्शनी भाग कोसळला असला तरी छत सुरक्षित आहे. महाराष्ट्रातील अतिविशाल सभागृहांमध्ये याचा समावेश होतो. हे सभागृह २१ मीटर बाय १६ मीटर एवढे विशाल आहे. या सभागृहाचे डाव्या बाजूस व मागील भिंतीत एकूण १७ खोल्या खोदलेल्या आहेत. प्रत्येक खोलीत दगडी ओटा आणि चौकोनी खिडकी आहे. काही खोल्या एकांतवासासाठी खोदल्या आहेत. सभागृहांमध्ये ठाणाळे लेण्यांप्रमाणे नक्षीकाम नाही किंवा लेण्यांचा काळ ठरवण्यासाठी शिलालेख नाही. सभागृहाच्या पुढील बाजूस पाणी साठवण्याचे बंदिस्त टाके आहे. लेण्यांमध्ये काही ठिकाणी भिंतीस लागून शयन कोठे बांधले आहेत व भिंतींमध्ये कोनाडे ठेवण्यात आले आहे. लेणी समूहात एकूण अकरा लेणी असली तरी मुख्य सभागृह व त्याच्या बाजूकडील सदनिका वगळता काही ठिकाणी लेणी कोसळली आहेत. याच लेण्यांच्या पश्चिम बाजूस अर्धा किमी अंतरावर चांभार लेणी आहेत, परंतु येथील डोंगराचे कडे तुटल्याने येथे जाता येत नाही. या लेणी समुहाचा उपयोग चौल बंदरातून नागोठणेमार्गे मावळात जाणाऱ्या व्यापारी मार्गासाठी केलेला आहे. ही प्राचीन लेणी १८८९पर्यंत जगात अपरिचित होती, परंतु १८९०मध्ये रेव्हरंड ॲबट यांनी लेण्यांचा प्रथम शोध लावला. तेव्हापासून या लेण्यांची काहीही दुरुस्ती झालेली नाही. प्रतिकूल निसर्ग परिस्थिती व मानवी देखभालीची उदासीनता यामुळे लेण्यांचा हा सांस्कृतिक ठेवा यापुढे आणखी किती काळ आपले अस्तित्व टिकवून ठेवेल याबाबत शंका आहे.

**नेणवली लेण्यांपर्यंत कसे पोहचाल?**

पालीपासून नेणवली व खडसांबळे हे गाव साधारण १५-१६ किमी अंतरावर आहे. खडसांबळे गावी येण्यासाठी पालीवरून एसटीची सुविधा उपलब्ध आहे. खडसांबळे ते लेणी चालत पार करावे लागते.

**गोमाशी लेणी** : गोमाशी येथे बौद्ध लेणी समूह आहे. त्याला काही लोक भृगु ऋषींची लेणीदेखील संबोधतात. गोमाशी गावाजवळ सरस्वती नदीकाठी खोंडा नावाचा डोंगर आहे. या डोंगरातील एका घळीत घळईत १.५ मीटर उंचीची गौतम बुद्धांची प्रतिमा कोरण्यात आली आहे. कोणी याला भृगु ऋषींची मूर्ती म्हणते. हे ठिकाण म्हणजे नागोठणे खाडीमार्गे ताम्हिणी घाटात मावळात जाणाऱ्या मार्गावरील एक लेणे आहे. या लेण्यांकडे जायचे असेल तर पालीपासून गोमाशी अंतर १४ किमी आहे. गोमाशी गावापर्यंत एसटीची सोय आहे. या लेण्यांमध्येदेखील पडझड झाली आहे. लेण्यांपर्यंत जाणाऱ्या मार्गाची दूरवस्था झाली आहे.

**जोपासण्याची गरज**

**येथिल स्तूप, विहार, चैत्यगृह, शिलालेख स्मारक यांची मोठ्या प्रमाणात पडझड झाली असून त्यावर अनेक उपद्रवी लोकांनी चक्क ऑईल पेन्टने नावे लिहिली आहेत. त्यामुळे ही ऐतिहासिक व इतिहासाची भरभक्कम साक्ष देणाऱ्या या वास्तु नामषेश होण्याची भिती आहे. प्राचीन इतिहासाची साक्ष देणारा हा मौलिक ठेवा जोपासण्याची नितांत गरज आहे. अनेक देश विदेशातील पर्यटक व बौद्ध अभ्यासक इथे भेट देत असतात. पर्यटकांना योग्य सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्यास या ठिकाणी पर्यटन वाढीला देखील खूप संधी आहे. तसेच हौशी पर्यटकांनी येथील वास्तूला विद्रुप किंवा हानी करू नये.**



## बदलते तंत्रज्ञान

# आता चॅट जीटीपी करणार माणसांप्रमाणे काम

ओपन एआय कंपनीने एआय जीटीपी ४ हे टूल लॉन्च केले आहे. कंपनी म्हणते की, जीटीपी ४ हे एक मोठे मल्टीमोडल मॉडेल आहे. नवीन सिरीज एआय व्हिडिओ कंटेंट आणि चित्रपटांद्वारे प्रतिसाद देण्यास सक्षम असणार आहे. हे जीटीपी ४ मानव करतो तशीच कामे करू शकतो. ही कामे कोणकोणती आहेत हे जाणून घेऊयात.




१. जीटीपी ३ आणि ३.५पेक्षा जीटीपी ४ची रचना थोड्या वेगळ्या पद्धतीने करण्यात आली आहे. ज्यामुळे ते आधी विश्वसाई आणि क्रिएटिव्ह वाटते.

२. जीटीपी ४ला इमेज इनपुट समजू शकते आणि गुगल लेन्सप्रमाणेच मजकूर आधारित माहिती देऊ शकतो. वापरकर्ते वस्तू ओळखण्यासाठी किंवा फोटोमधील मजकूर समजण्यासाठी फोटो अपलोड करू शकतात.

३. जीटीपी ४देखील ३.५ आणि ३पेक्षा इतर भाषा चांगल्या प्रकारे समजू शकतो. जीटीपी ४ उपलब्ध झाल्यानंतर, भारतीय विकासक ते त्यांच्या टूल्समध्ये त्याचा समावेश करू शकतात. हे टूल्स अनेक भारतीयांना मदत करेल ज्यांना त्यांच्या मूळ भाषेत टायपिंग करायला आवडते.

४. ओपनएआय म्हणते की, जीपीटी ४ मागील जनरेशनपेक्षा अधिक क्रिएटिव्ह आणि सहयोगी आहे. हे टूल वापरकर्त्यांसोबत सर्जनशील आणि तांत्रिक लेखन यांचा कंटेंट म्हणजेचच गाणी लिहिणे, पटकथा लिहिणे किंवा वापरकर्त्याची लेखन शैली शिकणे तयार आणि एडिट करू शकते.


५. चॅट जीटीपीबाबत लोकांमध्ये चिंतेची बाब देखील आहे की, हे टूल गृहपाठ करण्यासाठीदेखील मदत करू शकते. हेच कारण अनेक विद्यापीठांसाठी चिंतेचा विषय बनले आहे.

६. ओपनएआय सिस्टम मेसेजेस नावाचे नवीन पीआयदेखील लॉन्च करीत आहे जेणेकरुन विकसक वापरकर्त्याचा अनुभव त्यांच्या इच्छेनुसार तयार करू शकणार आहेत.

७. जीटीपी ४ सामान्य मजकूर इनपुट व्हिडिओमध्ये रूपांतरित करू शकतो की नाही हे ओपनआयने अद्याप स्पष्ट केलेले नाही. यामध्ये महत्त्वाचे म्हणजे मायक्रोसॉफ्टकडे अशी क्षमता असलेले टूल असल्याची घोषणा कंपनीने केली आहे.

८. ईमेल आणि कॅलेंडरचे विश्लेषण करणे यामध्येसुद्धा जीटीपी ४ अत्यंत उपयोगी ठरू शकते. हे टूल अधिक प्रगत आभासी सहाय्यक म्हणून काम करू शकते. रोजचा अजेंडा तयार करण्यासाठी तसेच ईमेल आणि कॅलेंडरचे विश्लेषण करण्यासाठी वापरकर्ते जीटीपी ४ टूलची मदत घेऊ शकतात.

# वास्तववादी चित्रकार महादेव धुरंधर



**निमित्त**

महादेव विश्वनाथ धुरंधर यांचा जन्म मुंबईस, आजोळी झाला. त्यांच्या आई नर्मदाबाई व वडील विश्वनाथ कृष्णनाथ ऊर्फ भाईसाहेब धुरंधर हे कोल्हापुरात प्रतिष्ठित व्यक्ती म्हणून गणले जात. त्यांचे शालेय शिक्षण कोल्हापुरातील राजाराम हायस्कूलमध्ये झाले. त्या काळात रविवर्मा यांच्या घरोघरी लागलेल्या चित्रांची मोहिनी त्यांच्यावर पडली.

शालेय जीवनात त्यांची चित्रकलेची आवड वाढू लागली. त्यांना वेळोवेळी प्रदर्शनांत बक्षिसेही मिळाली. याच काळात कोल्हापुरातील प्रसिद्ध चित्रकार आबालाल रहिमान यांच्या प्रेरणेने त्यांना जलरंगाची आवड निर्माण झाली. आबालाल यांच्या निसर्गचित्रांचे प्रात्यक्षिकही पाहण्यास मिळाले. मॅट्रिकच्या परीक्षेसाठी ते मुंबईला गेले असताना त्यांना सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट ही कलाशाळा पाहण्याची संधी मिळाली. त्यामुळे प्रेरित होऊन त्यांनी १८९० ते १८९६ या काळात तेथे कलाशिक्षण घेतले.

हे शिक्षण सुरू असतानाच १८९३मध्ये त्यांच्या वडिलांचे अचानक निधन झाले. अपार मेहनत व जिद्द ठेवून प्रत्येक परीक्षेत प्रथम क्रमांक व शिष्यवृत्तीही मिळवणाऱ्या धुरंधरांनी त्यांच्या बंधूंवर आपल्या शिक्षणाचा आर्थिक भार पडू दिला नाही. शिक्षणाच्या काळात त्यांना 'वॉडिग्टन' पुरस्कार (१८९१), 'बॉम्बे आर्ट सोसायटी' (१८९२), 'मेयो' पदक (१८९४) अशी पारितोषिके मिळाली. जे. जे. चे प्रिन्सिपल ग्रिफिथ्स यांनी १८९५ मध्ये धुरंधरांकडून विविध प्रकारच्या भांड्यांची सुमारे शंभर चित्रे काढून घेतली. ही सर्व चित्रे लंडनमध्ये, सरकारतर्फे प्रसिद्ध होणाऱ्या 'इंडियन आर्ट जर्नल'मध्ये छापली गेली.

आर्ट स्कूलमध्ये उत्तम गुण मिळवून शिक्षण पूर्ण केल्यामुळे धुरंधरांची नेमणूक १८९६मध्ये कलाशिक्षक म्हणून सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये झाली. आपल्या कर्तव्यतत्परतेमुळे ते हेडमास्टर (विभागप्रमुख) झाले. धुरंधरांनी ऐतिहासिक व पौराणिक विषयांवर वास्तववादी व मानवाकृतिप्रधान चित्रे रंगविली. त्यांच्या 'म्युझिक लेसन' या चित्राला १८९४मधील बॉम्बे आर्ट सोसायटीच्या प्रदर्शनात रोख रकमेचे पारितोषिक लाभले. विशेष म्हणजे चित्रकार राजा रविवर्मा यांना हे चित्र आवडून त्यांनी ते विकत घेतले. धुरंधरांच्या 'गौरबाई तू आलीस' या चित्राला १८९५ मध्ये बॉम्बे आर्ट सोसायटीच्या प्रदर्शनात सुवर्णपदक लाभल्यामुळे ते एकदम प्रसिद्धीच्या झोतात आले कारण प्रथमच एका भारतीय चित्रकाराला बॉम्बे आर्ट सोसायटीच्या प्रदर्शनात सुवर्णपदक लाभले होते. धुरंधरांनी आपल्या कारकिर्दीत एकूण पाच सुवर्णपदके मिळवली. त्यांना १९०४ मध्ये मुंबईस भरलेल्या औद्योगिक प्रदर्शनाच्या वेळी दुसरे सुवर्णपदक मिळाले. पंढरपूर येथे १९०७ मध्ये भरलेल्या फाइन आर्ट इंडस्ट्रिअल एक्झिबिशनमध्ये धुरंधरांच्या 'नैवेद्य' या चित्राला तिसरे सुवर्णपदक मिळाले. त्यांना १९१० मध्ये जळगावच्या औद्योगिक प्रदर्शनात 'वऱ्हाडणी' या चित्रासाठी चौथे सुवर्णपदक मिळाले. या चित्रात पाठारे प्रभूंच्या विवाहप्रसंगी नववधू व कुटुंबातील इतर स्त्रियांची लगबग दाखविली आहे. हे चित्र सांगलीच्या संग्रहालयात आहे. ग्वाल्हेर येथे १९१२ मध्ये भरलेल्या औद्योगिक प्रदर्शनात 'होमेज टू देअर मॅजेस्टीज किंग अँड क्वीन' या चित्रासाठी धुरंधरांना पाचवे सुवर्णपदक मिळाले. यांत ब्रिटिश सम्राट व सम्राज्ञी यांच्या भारतभेटीच्या प्रसंगी भारताच्या विविध प्रांतांतील स्त्री-पुरुष त्यांना नजराणे देताना दाखविले होते. याखेरीज १९२३ मध्ये अत्यंत प्रतिष्ठेच्या लंडनच्या वेम्बले येथील प्रदर्शनातील उत्कृष्ट जलरंगासाठी पारितोषिक मिळालेले त्यांचे 'ग्लोरी ऑफ पंढरपूर' हे चित्र गाजले.

धुरंधरांनी व्यक्तिचित्रांसोबतच भारतीय सण, उत्सव, परंपरा या विषयांवरही चित्रे रंगविली. उच्च मध्यमवर्गीयांच्या चालीरीती, विशेषत: त्यांच्या स्वत:च्या पाठारे प्रभू ज्ञातीतील रितीरिवाज त्यांनी या चित्रांतून दाखविले. या सर्वांत तत्कालीन समाजजीवनाचे पुरेपूर प्रतिबिंब असल्याने इतिहासाच्या व सामाजिक जीवनाच्या अभ्यासकांच्या दृष्टीनेही या चित्रांचे महत्त्व आहे.

**-साभार महाराष्ट्र नायक**

**क्लिक...क्लिक...!**



**अलिबाग : नदीचा शांत प्रवाह उथळ समुद्राला जाऊन मिळत असतानाचा क्षण...** (छाया : आदित्य वैद्य)

## आरोग्य प्रहर

# शांत झोप लागण्यासाठी 'हे' पदार्थ टाळावेत!

अनेक ठिकाणी सूर्यास्तापूर्वी किंवा सूर्यास्त झाल्यावर लगेच जेवण करण्याची परंपरा पाहायला मिळते. आहारशास्त्रानुसार, संध्याकाळ झाल्यानंतर पदार्थांचे सेवन कमी प्रमाणामध्ये करणे योग्य मानले जाते, मात्र बदललेल्या जीवनशैलीमुळे बऱ्याच जणांच्या जेवणाच्या सवयींमध्येही बदल झाले आहेत. लोक सकाळी उपाशी राहून रात्री प्रमाणापेक्षा जास्त जेवण करू लागले आहेत. यामुळे वजन वाढणे, झोप न लागणे या समस्यांचे प्रमाणही वाढत आहे. आहारतज्ज्ञ सलोनी झवेरी यांनी रात्रीच्या वेळी कोणते पदार्थ खाणे टाळावेत याविषयीची माहिती दिली आहे.



**कॅफिनयुक्त पदार्थ** : कॉफी, सोडा, चहा यांसारख्या पदार्थांमध्ये कॅफिन हा पदार्थ आढळतो. याच्या सेवनामुळे शरीरामध्ये तरतरी येते आणि झोप नाहीशी होते. रात्री झोपण्याआधी कॅफिनयुक्त पदार्थ शरीरामध्ये गेल्याने लवकर झोप येणार नाही.

**अल्कोहोल** : बऱ्याचजणांना रात्री मद्यपान करायची सवय असते. याच्या सेवनामुळे झोपेमध्ये व्यत्यय येऊ शकतो किंवा रात्री-अपरात्री जाग येऊ शकते. त्यामुळे रात्री झोपण्याआधी मद्यपान करणे टाळण्याचा सल्ला दिला जातो.

**मसालेदार पदार्थ** : चमचमीत मसालेदार पदार्थ चविष्ट असले तरी त्यांची पचनाची प्रक्रिया फार संथगतीने पूर्ण होत असते. रात्री झोपण्यापूर्वी असे पदार्थ खाल्याने छातीमध्ये आणि पोटामध्ये जळजळ होऊ शकते. अशा स्थितीमध्ये झोपताना त्रास होऊ शकतो.

**साखरयुक्त पदार्थ** : रक्तातील साखरेची पातळी वाढल्यास निद्रानाशाचा धोका संभवतो. म्हणून रात्री झोपण्यापूर्वी अतिप्रमाणात साखर असलेल्या पदार्थांचे सेवन करणे टाळावे.

**हाय-प्रोटीन असलेले पदार्थ** : मानवी शरीरासाठी प्रथिने फार आवश्यक असतात. यांच्या मदतीने शरीराची वाढ होत असते. परंतु अति प्रमाणात हाय-प्रोटीन असलेल्या पदार्थांच्या सेवनामुळे शरीराला त्रास होऊ शकतो. हाय-प्रोटीन पदार्थ खाल्याने अस्वस्थ वाटू शकतो. परिणामी झोपमध्ये व्यत्यय आल्याने निद्राचक्र बिघडू शकते. यामुळे रात्री चरबीयुक्त आणि उच्च प्रथिनेयुक्त पदार्थ खाऊ नये.

# रायगडला 'अवकाळी'चा फटका

## शेतकरी, बागायतदारांचे नुकसान; पांढरा कांदा, आंबा पिकावर संकट

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात गुरूवारी (दि.१७) झालेल्या अवकाळी पावसाने आंबा बागायतदारांचे मोठे नुकसान झाले आहे. अलिबाग तालुक्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांचेदेखील नुकसान झाले आहे.

गुरूवारी संध्याकाळी जिल्हयाच्या बहुतांश भागात अवकाळी पावसाने दमदार हजेरी लावली. या पावसाचा सर्वाधिक फटका आंबा बागायतीला बसला आहे. पावसाने बागेतील आंब्याचा मोहोर गळून पडला. नुकत्याच धरलेल्या छोट्या फळांचीदेखील पडझड झाली.

पाऊस पडल्यामुळे जी मध्यम आकाराची फळे आहेत त्यांच्यावर करपा आणि देठकुजव्याचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पावसानंतर आंब्यावर येणाऱ्या रोगांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी उपाययोजना करणे गरजेचे आहे. देठकुजवा किंवा करपा टाळण्यासाठी झाडे हलवून घ्यावीत तसेच झाडांवर बुरशी नाशकांची फवारणी करावी. थायोफिनेट मिथाईल (१ ग्रॅम प्रतिलीटर) किंवा बोर्डो मिश्रण (५ ग्रॅम प्रतिलीटर) असे द्रावण करून फवारावे, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

अवकाळी पावसामुळे पांढरा कांद्याच्या रोपांची पूर्ण पडझड झाली असल्याने याचा फटका अलिबाग तालुक्यातील वाडगाव, खंडाळे, नेहुली, कार्ले, सागाव, तळवली येथील कांदे उत्पादकांना बसणार आहे.

### मोहोर करपला

**यंदा आंब्याला मोहोर उशिरा आला. फेब्रुवारीच्या अखेरीस आणि मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आलेल्या उष्णतेच्या लाटेमुळे बराचसा मोहोर करपला. त्यानंतर दोन वेळा अवकाळी पाऊस आला. त्यामुळे आंबा बागायतदारांचे नुकसान झाले आहे.**





**अजून कांदा काढला जात आहे. गुरुवारी झालेल्या अवकाळी पावसामुळे पांढरा कांदा उत्पादकांचे नुकसान झाले आहे. बियाणे तयार होत आले आहे. त्यांचे देखील नुकसान झाले आहे.**
**–सतीश म्हात्रे, कांदा उत्पादक शेतकरी**

**गुरूवारी संध्याकाळी झालेल्या पावसाने फळगळती मोठ्या प्रमाणावर झाली. मध्यम आकाराच्या फळाला रोगांच्या प्रादुर्भावाचा धोका आहे. लागोपाठच्या संकटामुळे यंदा आंब्याचे उत्पादन केवळ २० टक्के राहील.**
**– संदेश पाटील, आंबा बागायतदार**

## रोहा, सानेगाव येथे योजनांची जनजागृती

**अलिबाग :** जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा माहिती कार्यालय व स्वयंसिद्धा सामाजिक विकास संस्था, रोहा यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकाऱ्यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली शासनाच्या विविध योजनांची जनजागृती भाजी मार्केट रोहा व सानेगाव येथे करण्यात आली.

---

**उरण नगरपरिषद, उरण**
**ता. उरण, जिल्हा – रायगड पिन कोड ४०० ७०२**
**दूरध्वनी क्रमांक: २७२२२३२०**
Email ID : urancouncilrediffmail. com : uranmunicipal@gmail.com

दिनांक : १७/०३/२०२३ | जा.क्र.: उनप/. आरोग्य विभाग ३७९६/२०२३

### जाहीर आवाहन

''स्वच्छतोस्तव २०२३ (Swachhotsav 2023) स्पर्धा'' केंद्र शासनाद्वारे महिलांचा स्वछतेमधील सहभाग व त्यांचे स्वच्छते मधील नेतृत्व करण्यासाठी स्वच्छतोस्तव २०२३ (Women loon Leading Swachhata (WINS) Award-2023) अभियान/केंद्र स्तरावर राबविण्यात येत आहे. या स्पर्धेचा मुख्य उद्देश महिलांच्या स्वच्छते मधील सहभागापासून महिला नेतृत्वाखालील स्वच्छतेमध्ये झालेले संक्रमण साजरे करणे आहे. या स्पर्धेत सहभाग नोंदविण्यासाठी खालील ५ वर्गवारीनुसार पात्र व्यक्ती संस्था कडून उरण नगर परिषद कार्यालयात दि. १५ मार्च २०२३ ते ५ एप्रिल २०२३ या कालावधीत अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

1) Individual Women Entrepreneurs and Change Agents 2) Self Help Group
3) Microenterprises 4) Startups 5 ) NGO's

अर्जाचा नमुना उरण नगरपरिषद कार्यालयात उपलब्ध आहे.

अर्ज करणाऱ्या व्यक्ती/संस्थेने खालील क्षेत्रामध्ये काम केलेले असावे.

(a) सामुदायिक / सार्वजनिक शौचालयांचे व्यवस्थापन (Management of Community / Public Toilet) (b) सेप्टिक Tank स्वच्छता सेवा (Septic tank cleaning services) (c) वापरलेले पाणी/ सेप्टेज प्रक्रियेची सुविधा (Treatment facilities of used water / septage) (d) कचरा संकलन आणि वाहतूक (Municipal waste collection and transportation )

(e) सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया (Material recovery facility operation) (f) वेस्ट टू वेल्थ उत्पादने (Waste to wealth product)

g) पनकचरा व्यवस्थापन प्रक्रियेवी सुविधा (Treatment facility of solid waste management) (h) माहिती शिक्षण संभाषण, प्रशिक्षण व क्षमता वाढविणे (Information Education Communication Training and Capacity Building) (i) तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्ण संकल्पना (Technology and Innovation) (j) इतर (Other...to be specified)

या स्पर्धेत सहभाग नोंदविण्यासाठी वरील ५ वर्गवारीनुसार पात्र व्यक्ती/संस्था कडून उरण नगरपरिषद कार्यालयात दि. १५ मार्च २०२३ ते ५ एप्रिल २०२३ या कालावधीत अर्ज सादर करणे आवश्यक आहे. तरी. याबाबत काही शंका असल्यास अधिक माहितीसाठी उरण नगरपरिषद आरोग्य विभागाशी अथवा ८२०८७०८६५६ या क्रमांकावर संपर्क साधावा.

**सही /–**
**(राहुल इंगळे)**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद**

---

## पारगाण येथील महिला बेपत्ता



**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील शीघ्रे ग्रामपंचायत अंतर्गत पारगाण येथे राहणारी प्रमिला राम हिरवे (वय ३१) ही महिला ११ मार्च रोजी सकाळी १०–३० च्या सुमारास बेपत्ता झाल्याची तक्रार मुरुड पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

महिला मतिमंद असून ही महिला दिसताच मुरुड पोलिसांना कळवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अंगाने सडपातळ, भगव्या रंगाचा टॉप व भगव्या रंगाची लेगीज, पायात पैंजन, कानात सोन्याच्या रिंग, हातात बांगड्या आहेत. तिच्या हातात मेहंदीचा कोण होता. तो जंगल भागात हरविल्याने सदरील मेहंदीचा कोन आण्याकरिता पारगाण येथील जंगल भागात गेली असता. ती रस्ता चुकल्याने हरवली आहे. ही तक्रार तिचा भाऊ भूषण हिरवे यांनी दाखल केली आहे. याबाबतचा तपास पोलीस निरीक्षक प्रकाश सकपाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक व्ही. व्ही. आंबेतकर करीत आहेत.

---

**उरण नगरपरिषद**
**मुदतवाढ सूचना**

उरण नगरपरिषदेने उरण नगरपरिषदेच्या निसर्गऋण बायोगॅस प्लँट करीता ७०० किलो गॅस क्षमतेचे पर्यायी स्टंड बाय बायोक्रशर मशीन खरेदी करणे कामी दै.रामप्रहार व दै.किल्ले रायगड या वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दिनांक १६–०३–२०२३ रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत निविदा/दरपत्रके मागविणेत आलेल्या होत्या. परंतु दिलेल्या मुदतीत एकही निविदा प्राप्त झालेली नाही. सबब सदर कामी याद्वारे दिनांक २१–०३–२०२३ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत मुदतवाढ देणेत येत आहे. सदर कामी इच्छुक निविदादारांनी मुदतीत निविदा/दरपत्रके दाखल करावीत.

**सही/–**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद**

---

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत, जमिन मालकांकडून विकसनास घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:–

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे कोयनावेळे, ता. पनवेल, जि. रायगड**

| भूमापन नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु. पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|---|
| ३२ | ४ | ०–२०–२०<br>पो.ख. ०–०१–००<br>एकूण ०–२१–२० | १.५० | १) श्रीमती सुमित्रा मारुती कदम<br>२) श्री. जयराम मारुती कदम<br>३) श्री. राजाराम मारुती कदम<br>४) श्रीमती निरा सुभाष शिंदे<br>५) श्रीमती सुवर्णा रविंद्र सुर्वे<br>६) श्रीमती स्वाती चंद्रकांत कदम<br>७) श्री. गणेश चंद्रकांत कदम<br>८) श्री. ऋषिकेश चंद्रकांत कदम<br>९) श्रीमती मृणाली चंद्रकांत कदम उर्फ श्रीमती मृणाली मृगेश चव्हाण |

वरील वर्णन केलेली मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ इत्यादी कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे हातोहात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. १७/०३/२०२३.

**सही/–**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ.**

**कार्यालय :** २. आशादिप अपार्टमेंट पनवेल शहर पोलीस स्टेशन जवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल दूरध्वनी क्र.: ९९३०३६९८६१

---

### वेदविद्या गुरुकुलम् वारियर फाउंडेशन

**कोलखे पारपुंड गांव, शिफा हास्पिटल के पीछे,**
**मुम्बई – पुणे रोड, पलसप्पा फाटा,**
**पनवेल, नवी मुंबई ४१०२२१**
**महर्षि सान्दीपनि राष्ट्रीय वेदविद्या प्रतिष्ठान, उज्जैन**
**(शिक्षा मन्त्रालय भारत सरकार की स्वायत्तशासी संस्था)**
**द्वारा अनुदानित**

### आवश्यकता

अध्यापक संख्या – ०१ संस्कृत + सामाजिक विज्ञान, ०१ अंग्रेजी + गणित संस्कृत + सामाजिक विज्ञान (०१) विषय हेतु शैक्षणिक योग्यता–
शास्त्री/बी.ए./समकक्ष संस्कृत विषय के साथ होना अनिवार्य सामाजिक–विज्ञानादि विषय में स्नातक/बी.ए./समकक्ष स्तर पर इतिहास/अर्थशास्त्र/राजनीतिशास्त्र/भूगोल/समाजशास्त्र/ समाजकार्य/ मानवविज्ञान/अन्थ्रोपोलाजी/योगविज्ञान मे से एक या दो विषयों का अध्यापन आवश्यक है।
(बी.एड./एम.ए. अभ्यर्थियों को प्राथमिकता)
आधुनिक विषय अंग्रेजी+गणित (०१) हेतु शैक्षणिक योग्यता–
बी.एससी. (गणित), पी.सी.एम. ग्रुप/ फ़िजिक्स, केमेस्ट्री, मेथ अथवा बी.ए.(अंग्रेजी), स्नातक स्तर पर अंग्रेजी विषय के साथ गणित अनिवार्य है।
(एम.एस.सी. /बी.एड. के अभ्यर्थी को प्राथमिकता)

**मासिक मानदेय – प्रतिष्ठान नियमानुसार**
**आयु सीमा – २५ से ४० वर्ष**

अध्यापक की तात्कालिक सेवाएं महर्षि सान्दीपनि राष्ट्रिय वेदविद्या प्रतिष्ठान, उज्जैन के नियमानुसार होगी।
उपर्युक्त के सन्दर्भ में अभ्यर्थी अपने सभी अभिलेखों एवं आधार कार्ड की स्व प्रमाणित छाया प्रति के साथ प्रार्थना पत्र प्रबंधक/सचिव/ प्रचार्य
वेदविद्या गुरुकुलम् वारियर फाउंडेशन
कोलखे पारपुंड गांव, शिफा हास्पिटल के पीछे,
मुम्बई – पुणे रोड, पलसप्पा फाटा,
पनवेल, नवी मुंबई ४१०२२१
के नाम से डाक द्वारा अथवा स्वयं उपस्थित होकर अंतिम दिनांक ०५/०४/२०२३ तक पाठशाला कार्यालय में जमा करें। अन्तिम तिथि के पश्चात् प्राप्त आवेदन पत्रों पर विचार नहीं किया जायेगा।
पाठशाला का संपर्क सूत्र/मोबाईल :
९८१९०७४०९७/९८२००५००७१/८६५२७१२७७१

---

### मे. जिल्हा न्यायाधिश पनवेल यांचे न्यायालयात

दिवाणी चौकशी अर्ज क्र. २६/२०२३
नि. ८/ड

१. श्रीमती रन्जिता बिनोदकुमार यादव
२. कु. प्रणेश बिनोद यादव तर्फे अज्ञान पालन कर्ती आई सौ रन्जिता बिनोदकुमार यादव
३. कु. प्रीति बिनोद यादव तर्फे अज्ञान पालन कर्ती आई सौ. रन्जिता बिनोदकुमार यादव
४. कु. श्रुती बिनोद यादव तर्फे अज्ञान पालन कर्ती आई सौ. रन्जिता बिनोदकुमार यादव ......अर्जदार

सर्व तमाम लोकांस कळविण्यांत येते की, ज्याअर्थी **कै. बिनोद कुमार यादव** यांचे दिनांक ०३/०५/२०२२ रोजी सिरहा नगरपालीका वार्ड क्र. ६ सिराहा जिल्हा मध्यप्रदेश येथील हॉस्पीटल मध्ये निधन झाले. **कै. बिनोद कुमार यादव** यांचे मालकी हक्कात आणि ताबे कब्जात पुढील वर्णन केलेली मिळकत आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:–

**मिळकतीचे वर्णन**
**सदनिका क्र. १०१, डी–विंग, गुरूकुटीर कॉम्प्लेक्स को. ऑप. हौ. सोसायटी लि., प्लॉट नं. २४, सेक्टर ११, रोडपाली–कळंबोली, ता. पनवेल, जिल्हा रायगड, नवी मुंबई ४१०२१८**
**क्षेत्रफळ ४३.१२ चौ. मी. बिल्टअप व ३५.९६ चौ. मी. कारपेट.**

अज्ञानाची स्थावर मिळकत विक्री परवानगी मिळणेकामी अर्ज केला आहे. मयत **कै. बिनोद कुमार यादव** यांच्या पश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार यांच्या या हक्काबाबत कोणालाही व्यक्तिगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन वर नमुद मे. न्यायालयात दिनांक २५/०४/२०२३ रोजी पर्यंत हजर राहून आपल्या हरकती सादर करावयाच्या आहेत.

याद्वारे असे जाहीर करण्यांत येते की, वर नमुद कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे. न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबाबत पुरावा देण्याची ताबडतोब कारवाई करतील व अज्ञानाची स्थावर मिळकत विक्री परवानगी मिळणेकामी अर्जदार हक्कदार आहेत असे शाबित झाल्यास त्यांना विक्री परवानगी मंजूर करील.

सदरची नोटीस आज दिनांक १७/३/२०२३ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**लिपिक**
**मे. जिल्हा न्यायालय**
**पनवेल, जिल्हा रायगड**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा. अधिक्षक**
**मे. जिल्हा न्यायालय**
**पनवेल, जिल्हा रायगड**

---

**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
Email :-mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167

### निविदा सूचना क्रमांक ९९ सन २०२२–२०२३
### (अल्प कालावधी निविदा सुचना)

खालील कामासाठी सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड, मु.पो.ता. महाड, जिल्हा. रायगड पिनकोड नं. ४०२३०१ दूरध्वनी क्रमांक ०२१४५–२२२१६७ हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून बी–१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. को–या निविदा नमुना **दिनांक १५/०३/२०२३ रोजी सकाळी १०.०० पासून ते दिनांक २३/०३/२०२३ रोजी १८.०० वाजेपर्यंत** www.mahapwd.gov.in या संकेत स्थळावरुन ऑनलाईन खरेदी करण्यांत येतील. व **दिनांक २४/०३/२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता ऑफलाईन पध्दतीने या कार्यालयात सादर कराव्यात** व कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, महाड हे भरुन पाठविलेल्या निविदा शक्यतो **दिनांक २४/०३/२०२३** रोजी **११.००** वाजता उघडतील. निविदा उघडताना सर्व कंत्राटदारांची उपस्थित रहाणे आवश्यक आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखुन ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई–निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे कोस्ते बुद्रुक तालुका, माणगांव येथे सामाजिक सभागृह बांधणे, तालुका माणगांव, जिल्हा रायगड. **(खा. स्था. वि.)** | ८४३११९ | ९००० | ५९०/– | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| २ | मौजे निजामपुर, तालुका, माणगांव येथे सामाजिक सभागृह बांधणे, तालुका माणगांव, जिल्हा रायगड. **(खा.स्था. वि.)** | ८४३८३१ | ९००० | ५९०/– | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ३ | मौजे वडघर मुद्रे ग्रा.पं. मांजरवणे येथे सामाजिक सभागृह बांधणे, तालुका माणगांव, जिल्हा रायगड. **(आ. स्था. वि.)** | ८४२८४८ | ९००० | ५९०/– | ३ महिने | वर्ग आठ व वरील |
| ४ | माणगांव येथील प्रांत निवासस्थान इमारतीची दुरुस्ती करणे तालुका माणगांव, जिल्हा रायगड. **(२२१६)** | ९२८५०३ | १०००० | ५९०/– | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ५ | ग्रा.पं. भानंग मौजे भानंगगांव येथे सामाजिक सभागृह करणे, तालुका तळा, जिल्हा रायगड. **(२५१५)** | ८१६३११ | ९००० | ५९०/– | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ६ | ग्रा.पं. मौजे मालुक बौध्दवाडी येथे अंतर्गत रस्ता तयार करणे, तालुका तळा, जिल्हा रायगड. **(२५१५)** | २४४४०६ | ३००० | ५९०/– | ३ महिने | वर्ग नऊ व वरील |
| ७ | ग्रां.पं. भानंग मौजे भानंगकोंड येथे स्मशानशेड सुशोभिकरण व जाणारा रस्ता तयार करणे, तालुका, तळा, जिल्हा रायगड. **(२५१५)** | ४०७८५७ | ५००० | ५९०/– | ३ महिने | वर्ग आठ व वरील |
| ८ | मौजे हळदुले ग्रा.प. देवळे, ता. पोलादपूर येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. **(डोंगरी)** | ४०८५३३ | ५००० | ५९०/– | ३ महिने | वर्ग आठ व वरील |
| ९ | मौजे कापडे खुर्द ग्रा. प. कापडे खुर्द ता. पोलादपूर येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. **(डोंगरी)** | ८१४०४५ | ९००० | ५९०/– | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| १० | मौजे चिरेखिंड ग्रा.प. कापडे खु. येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. **(डोंगरी)** | ५७०६५४ | ६००० | ५९०/– | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ११ | मौजे चांभारगधी बु. ग्रा.प. चांभारगण बु., ता. पोलादपूर येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. **(डोंगरी)** | ४०८४१३ | ५००० | ५९०/– | ३ महिने | वर्ग आठ व वरील |
| १२ | बांगमांडला आंबेत टोळ वीर रस्ता रा.मा. १०० कि.मी. १५/८०० मधील मो–याची दुरूस्ती व संरक्षक भिंतींचे बांधकाम करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. **(पुरहानी दुरूस्ती)** | ८१८४९५ | ९००० | ५९०/– | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| १३ | बागमांडला आंबेत टोळ वीर रस्ता रा.मा. १०० कि.मी. २३/२०० मधील मो–याची दुरूस्ती व संरक्षक भिंतींचे बांधकाम करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. **(पुरहानी दुरूस्ती)** | ८३५४०६ | ९००० | ५९०/– | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| १४ | बांगमांडला आंबेत टोळ वीर रस्ता रा.मा. १०० कि.मी. २४/००० मधील मो–याची दुरूस्ती व संरक्षक भिंतींचे बांधकाम करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. **(पुरहानी दुरूस्ती)** | ८२६८३१ | ९००० | ५९०/– | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| १५ | भावे किये पदाजी रायाचा कोंड रस्ता प्र.जि.मा. ९५ कि.मी. ३/३०० ते ३/४०० मध्ये पूलाचे रोलिंग करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(पुरहानी दुरूस्ती)** | ३७७३९० | ४००० | ५९०/– | ३ महिने | वर्ग नऊ व वरील |

टिप :– १) तपशिलवार निविदा सुचना https//mahapwd.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील ..

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/१२३०**
**दिनांक : १०/०३/२०२३**

**सही/–**
**(एम. आर. नामदे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

**विमाका/कोवि/२०२२–२०२३/३१३**

## नवी मुंबईवर 'सीसीटीव्ही'ची नजर

# १५००पैकी ७०२ कॅमेरे बसवले

### मध्यवर्ती नियंत्रण कक्षाची आयुक्तांकडून पाहणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई शहर सुरक्षिततेला बळकटी देणाऱ्या सीसीटीव्ही प्रकल्पाच्या कामास सुरुवात झालेली असून महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी शहर अभियंता संजय देसाई आणि अतिरिक्त शहर अभियंता शिरीष आरदवाड यांच्यासह सीसीटीव्ही प्रणाली मुख्य नियंत्रण कक्षाची प्रत्यक्ष पाहणी करीत हा प्रकल्प अधिक परिपूर्ण व सर्वसमावेशक होण्याच्या दृष्टीने सूचना केल्या.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने १५००हून अधिक सीसीटीव्ही कॅमेरे संपूर्ण शहरभर बसविण्यात येत असून त्याचा मध्यवर्ती नियंत्रण कक्ष महापालिका मुख्यालयात पहिल्या मजल्यावर स्थापित करण्यात आला आहे. सध्या नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात ७०२ विविध प्रकारचे हायडेफिनेशन कॅमेरे बसविण्यात आले असून ६३ कॅमेरे मुख्य नियंत्रण कक्षाशी जोडण्यात आलेले आहेत. आयुक्तांनी मुख्य नियंत्रण कक्षाच्या भेटीमध्ये कॅमेरा लावलेल्या ठिकाणावरील सीसीटीव्ही छायाचित्रीकरण पाहिले. हे सर्व कॅमेरे हायडेफिनेशन असून आयुक्तांनी नियंत्रण कक्षाशी जोडलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे झूम इन व झूम आऊट करून शहरात काही भागात सुरू असलेल्या हालचालींची पाहणी केली.





सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी ५९२ ठिकाणी खाबांकरिता काँक्रिटचा पाया तयार करण्यात आला असून ५३४ खांब उभारण्यात आलेले आहेत. आयुक्तांनी ही सर्व माहिती सविस्तर जाणून घेतली व कोणत्या भागातील कॅमेरे कार्यान्वित झालेले आहेत तसेच कोणत्या भागातील खांब बसवून झालेले आहेत याची विस्तृत माहिती घेतली.

पोलीस विभागाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असे ९६ इव्हिडन्स कॅमेरे हे २४ मुख्य ट्रॅफिक जंक्शनवर बसविण्यात येत असून २८८ एएनपीआर म्हणजेच टोमॅटीक नंबर प्लेट रेक्गनेशन कॅमेरे देखील बसविण्यात येत आहेत. या एएनपीआर कॅमेऱ्याद्वारे स्वयंचलित पद्धतीने वाहनांवरील नंबर प्लेट वाचन करता येणार आहे. ही यंत्रणा कार्यान्वित झाल्यानंतर सिग्नल तोडणाऱ्या तसेच वाहतुकीच्या इतर नियमांचा भंग करणाऱ्या वाहनचालकांच्या घरी थेट दंडात्मक चलन फोटोसह पाठविले जाणार आहे. २४ ट्रॅफिक जंक्शनवर पब्लिक अनाउन्समेंट सिस्टीम बसविण्यात येत असून याद्वारे आपत्कालीन व्यवस्थेच्या दृष्टीने अत्यावश्यक क्षणी नागरिकांकरिता सीसीटीव्ही नियंत्रण कक्षातून महत्त्वाच्या सूचना देणे शक्य होणार आहे.

#### महापालिका क्षेत्रात ५४० स्थानांवर कॅमेरे

*या प्रकल्पांतर्गत नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ५४० स्थानांवर विविध प्रकारचे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येत असून २३० स्थानांवर कॅमेरे बसवून झालेले आहेत. त्यामध्ये शहरातील मुख्य चौक, बस डेपो, मार्केट, उद्याने, मैदाने, नाके, वर्दळीची ठिकाणे, नमुंमपा कार्यालये, पामबीच, ठाणे-बेलापूर रोड, सायन-पनवेल असे जास्त रहदारीचे रस्ते येथे हाय डेफिनेश कॅमेरे बसविण्यात येत आहेत. याशिवाय नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्राला लाभलेला विस्तारित सागरी किनारा लक्षात घेऊन सागरी सुरक्षेच्या दृष्टीने नऊ थर्मल कॅमेरे बसविण्यात येत आहेत.*

## नवी मुंबई मनपातर्फे आशा स्वयंसेविका, एएनएम यांचा सन्मान



**नवी मुंबई : बातमीदार**

कोव्हीड लसीकरण असो की इतर कोणतीही लसीकरण मोहीम असो, नवी मुंबई महानगरपालिका लसीकरण मोहीम राबविण्यामध्ये नेहमीच राज्यात अव्वल राहिली असून यामध्ये घराघरापर्यंत आरोग्य विषयक जनजागृती करणाऱ्या व माहिती पोहचविणाऱ्या आशा स्वयंसेविकांचा सर्वात मोठा वाटा आहे. म्हणून 'आशा दिवस' साजरा करण्याचे ठरविले असल्याचे अतिरिक्त आयुक्त संजय काकडे यांनी सांगितले.

नवी मुंबई महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने राष्ट्रीय लसीकरण दिवसाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या आशा दिवस विशेष कार्यक्रमाप्रसंगी ते आपले मनोगत व्यक्त करीत होते. या वेळी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रमोद पाटील, वैद्यकीय अधीक्षक डॉ. वर्षा राठोड व डॉ. उद्धव खिल्लारे, लसीकरण नोडल अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी डॉ. रत्नप्रभा चव्हाण व डॉ. राजेश म्हात्रे आदी उपस्थित होते.

या वेळी राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत माता व बाल आरोग्य, नियमित लसीकरण, पल्स पोलीओ लसीकरण, साथरोग सर्वेक्षण, आरोग्य शिक्षण अशा विविध कार्यक्षेत्रात राष्ट्रीय कार्यक्रमामध्ये सहभागी होणाऱ्या २३ नागरी आरोग्य केंद्रातील प्रत्येकी एका सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या आशास्वयंसेविकेला सन्मानित करण्यात आले. त्याचप्रमाणे प्रत्येक नागरी आरोग्य केंद्रातील सर्वोत्कृष्ट एएनएम झिरो ऑडिट पॉईंट असणारे नागरी आरोग्य केंद्रातील उत्तम कामगिरी करणारे लिपीकांना सन्मानित करण्यात आले. २०२२-२३ मध्ये नवी मुंबई महानगरपालिका रुग्णालयात २५००हून अधिक महिला कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया झालेल्या असून २०००पेक्षा जास्त शस्त्रक्रिया करणारे सार्वजनिक रुग्णालय वाशी येथील स्त्रीरोग विभाग प्रमुख आणि नेरूळ रुग्णालयाचे निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेश म्हात्रे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

सर्वोत्कृष्ट आशा स्वयंसेविका पुरस्काराकरिता ललीता यादव, अनिसा शेख व रुक्मिणी तेली या मानकरी ठरल्या. सन २०२२-२३मध्ये २५००पेक्षा अधिक कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया झालेल्या असून त्यामध्ये १०० टक्के लक्ष्य पूर्ण करणाऱ्या नागरी आरोग्य केंद्र नेरुळ फेज १ व नोसिल नाका यांचे वैद्यकीय अधिकारी व एलएचव्ही आणि एनएम यांना सन्मानित करण्यात आले.

याशिवाय ज्या आरोग्य केंद्रातील सहायक परिचारिका मिडवाइफरींनी जास्तीत जास्त कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेकरिता महिला लाभार्थ्यांना संदर्भित केले आहे त्यामध्ये घणसोलीतील पुनम वाकोडे, दिघातील पौर्णिमा परांजपे आणि हंसा चौधरी यांना अनुक्रमे पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

## सूचनाकार व हरकतीदारांचे वकीलपत्र स्वीकारावे

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या सर्वांगीण विकासासाठी सुवर्ण विकास सूचनाधारक आणि हरकतीदार यांची सुनावणी समितीसमोर बाजू मांडण्यासाठी कोणताही मोबदला न घेता वकीलपत्र आपण स्वीकारावे, अशी मागणी नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्था पदाधिकाऱ्यांनी नवी मुंबई वकील संघटनेकडे केली आहे.

नवी मुंबईत सिडको १९७० साली स्थापन झाली. एमआरटीपी ॲक्टनुसार दर २० वर्षांनी शहराच्या निश्चित केलेल्या लोकसंख्येला सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जमिनी राखीव ठेवणे व त्यांचा विकास करणे याकरिता, विकास आराखडा वेळोवेळी जनतेसमोर सादर करणे व मंजूर करणे बंधनकारक आहे, परंतु गेल्या ५२ वर्षात प्रथमच विकास आराखडा जनतेच्या मंजुरीस नवी मुंबई मनपाने ठेवला आहे.



नवी मुंबई पुनर्वसन संस्थेचे निवेदन

शहराचा विकास निरंतर ठेवण्यासाठी वकिलांच्या नवी मुंबई शहराच्या सर्वांगिण प्रगतीसाठी जागरूक योगदानाची गरज आहे. शहराच्या विकासाकरिता नवी मुंबई सामाजिक पुनर्वसन संस्था पदाधिकारी व जागृत नवी मुंबईतील नागरिकांच्या विनंतीचा सन्मान करून वकिलांनी व आपण सर्वांनी मिळून शहर विकासासाठी शहरात जागा उपलब्ध करूया अशी विनंती नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्था अध्यक्ष दशरथ भगत यांनी वकील संघटनेला केली आहे.

नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्था पदाधिकाऱ्यांनी नवी मुंबई दिवाणी न्यायालय बेलापूर येथे जाऊन आपले निवेदन नवी मुंबई वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. सुनील मोकल, सचिव ॲड. किरण भोसले, खजिनदार ॲड. दिनेश काळे, उपाध्यक्ष ॲड. संदिप रामकर व वकील पदाधिकारी यांना दिले आहे.

## मैदानासाठी जनआंदोलन उभारू -रणजित नाईक

**नवी मुंबई : बातमीदार**

फिफा फुटबॉल स्पर्धेसाठी सिवूड्स येथे तयार करण्यात आलेले सरावाच्या मैदानासाठी दारावे ग्रामस्थ आक्रमक होण्याची शक्यता आहे. भाजपचे युवा मोर्चाचे महामंत्री रणजित नाईक यांनी मैदानासाठी जनआंदोलन उभारू, असा इशारा महापालिकेला दिला आहे.

दारावे गावासाठी तसेच नेरूळ (पू.) याठिकाणी एक ही मैदान खेळासाठी उपलब्ध नाही. यशवंतराव चव्हाण मैदान हे एकमेव मैदान होते. नवी मुंबईमध्ये फिफा फुटबॉल विश्वचषक अंडर १९ स्पर्धा डी. वाय. पाटील स्टेडियम येथे झाल्या, परंतु या वेळी सराव करण्यासाठी मैदान उपलब्ध नव्हते. त्यामुळे महापालिकेने यशवंतराव चव्हाण मैदान याठिकाणी सरावासाठी फुटबॉल मैदानाची निर्मिती करीत असताना येथील ग्रामस्थांना लेखी स्वरूपात लिहून देण्यात आले की, फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धा संपल्यानंतर हे मैदान पुन्हा खेळाचे मैदान म्हणून उपलब्ध करून देण्यात येईल.

असे असतानाही आता अशी परिस्थितीत आहे की, नागरिकांना क्रिकेट तसेच विविध मैदानी खेळ खेळण्यासाठी जागाच उरलेली नाही त्यामुळे ग्रामस्थांनी नाराजी दर्शवली आहे. त्यामुळे या मैदानासाठी जनआंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

## निवडक

### होन्डा सिटी गाडीची चोरी

**पनवेल** : पनवेल तालुक्यातील एसबी गॅरेजसमोर कोळखे गाव येथे उभी करून ठेवलेली होन्डा सिटी गाडी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. किशन मलगी (वय ६०) यांनी पाच लाख २० हजार किमतीची सफेद रंगाची होन्डा सिटी गाडी (क्र. एमएच ४६ एपी ३०७०) ही सर्व्हिसींगसाठी दिली असता अज्ञात चोरट्याने ही गाडी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.


### महिला प्रवाशाची बॅग पळवली

**पनवेल** : महिला रेल्वे प्रवाशांची बॅग पळवल्याची घटना प्रवासा दरम्यान घडली आहे. खारघर येथे राहणाऱ्या आशालता येवले यांनी त्यांची बॅग लोकलच्या रॅकवर ठेवली असता अज्ञात चोरट्याने ही बॅग पळवली आहे. या बॅगेमध्ये रोख रकमेसह मोबाईल फोन असा मिळून जवळपास ११ हजार रुपये किमतीचा ऐवज होता.

## फळ बाजारात आवक वाढल्याने एपीएमसीबाहेर वाहतूक कोंडी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वाशीतील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीतील फळ बाजारात मोठ्या प्रमाणावर फळांची आवक वाढत आहे. आवक वाढल्याने फळ बाजाराबाहेर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. त्यामुळे एपीएमसी आवाराबाहेर दुपारपर्यंत वाहतूक कोंडी होती.



सध्या उन्हाचा पारा चढत असल्याने रसदार फळांची मागणी वाढत आहे. त्यामुळे एपीएमसी फळ बाजारात कलिंगड, टरबूज, पपई अशा फळांची आवक वाढली आहे. तसेच रमजान निमित्ताने या फळांना अधिक मागणी असते, त्यामुळे सध्या बाजारात फळांची आवक वाढत आहे. गुरुवारी फळ बाजारात एकूण ४८३ गाड्या आवक झाली होती. यात सर्वाधिक कलिंगडाची आवक होती, मात्र इतक्या मोठ्या प्रमाणात आवक वाढल्याने बाजार आवारात जागा कमी पडत होती, त्यामुळे बाजार आवाराबाहेर गाड्यांची लांबच लांब रांग लागली होती. या वाहनांच्या गर्दीने वाशी-तुर्भेकडे जाणाऱ्या रस्त्यावर वाहतूक कोंडी झाली होती.

## एमजीएम लॉ कॉलेजमध्ये स्नेहसंमेलन उत्साहात




**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नेरूळ येथील एमजीएम लॉ कॉलेजमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन 'इटरनस' या शिर्षकाखाली आयोजित करण्यात आले होते. या वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये इंटरकॉलेज क्रीडा स्पर्धा, बुद्धिमत्ता, नृत्य यांच्यासह विविध स्पर्धा आयोजित केल्या होत्या.

या वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त आयोजित केलेल्या क्रिकेट स्पर्धेत एमजीएम लॉ कॉलेजने प्रथम क्रमांक, फुटबॉल स्पर्धेत ए. सी. पाटील कॉलेजने प्रथम क्रमांक, नृत्य स्पर्धेत एमजीएमच्या केसीडी ग्रुपने प्रथम क्रमांक तर बुद्धिबळ स्पर्धेत एमजीएम लॉ कॉलेजचे सूरज करकाटे हे विजयी झाले.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. प्रसाद पी. सी. पाटील व ॲड. निरंत पाटील यांच्यासह कॉलेजच्या मुख्याध्यापिका गीता श्रीवास्तव, विभाग प्रमुख शीला होसामी, प्रो. वैशाली कपूरे, प्रो. वृषाली, प्रो. सोनिया मल्होत्रा आदींसह शिक्षक वर्ग उपस्थित होते. वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कॉलेजचे जनरल सेक्रेटरी संकल्प पाटील, डेप्युटी सेक्रेटरी श्रीहरी देशमुख, भार्गव सावंत, ओमकार आंधळे, रोहन कांबळे, अक्षता उपाध्य, लहू जोशी, अतीबा हसन, करुणा डांगे, जाई घरत, खुशी पठारिया, मोनिका आरगडे, राहुल पेडणेकर, स्नेहा काला, विश्वम म्हात्रे, किरण गायकवाड, प्रणील रणदिवे, पूजा तरकसे यांनी विशेष मेहनत घेतली.

# नेरूळचे वंडर्स पार्क लवकरच होणार सुरू

## नवीन राईड्स, म्युझिकल लेझर शो असणार प्रमुख आकर्षण

**नवी मुंबई : बातमीदार,प्रतिनिधी**

उद्यानांचे शहर म्हणून प्रसिद्ध असलेल्या नवी मुंबईतील नेरूळस्थित वंडर्स पार्क हे थीम गार्डन शहरातील आणि शहराबाहेरील पर्यटकांसाठी प्रमुख आकर्षण आहे. मागील दोन वर्षे वंडर्स पार्कच्या नूतनीकरणाचे काम सुरू होते ते आता जवळजवळ पूर्ण होत आले आहे. कामाच्या सद्यस्थितीचा पाहणीदौरा शुक्रवारी (दि. १७) माजी महापौर सागर नाईक यांनी केला.



या वेळी त्यांच्यासमवेत माजी महापौर जयवंत सुतार, माजी सभागृह नेते आणि स्थानिक नगरसेवक रवींद्र इथापे, माजी सभापती डॉ. जयाजी नाथ, माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत, माजी नगरसेविका सुरेखा इथापे, माजी नगरसेवक सुनील पाटील, विनोद म्हात्रे, गणेश म्हात्रे, गिरीश म्हात्रे, माजी नगरसेविका शिल्पा कांबळी, माधुरी सुतार, माजी परिवहन सभापती प्रदीप गवस, समाजसेवक गणेश भगत, रणजित नाईक, सुभाष गायकवाड, महापालिकेचे कार्यकारी अभियंता गिरीश गुमास्ते, उपअभियंता पंढरीनाथ चवडे आदी उपस्थित होते.

या पाहणी दौऱ्यादरम्यान सागर नाईक यांनी वंडर्स पार्कमध्ये ज्या ठिकाणी देखभाल आणि दुरूस्तीची आवश्यकता आहे, त्या ठिकाणी तशा प्रकारची कामे करण्याची सूचना केली. कोरोना काळामध्ये वंडर्स पार्क नागरिकांसाठी बंद करण्यात आले होते. महापालिकेच्या मावळत्या सभागृहाने या थीम पार्कच्या देखभाल आणि दुरूस्तीच्या कामाला मंजुरी दिली होती. दोन वर्षांपूर्वी हे काम सुरू झाले होते, मात्र ते धीम्या गतीने सुरू आहे. सुमारे २३ कोटी रुपये खर्च करून वंडर्स पार्कमध्ये नवीन खेळणी, नवीन राईड्स बसविण्यात आलेले आहेत. त्याचबरोबर म्युझिकल लेझर शो हे नवीन आकर्षण पर्यटकांना पहावयास मिळणार आहे.

आमदार गणेश नाईक यांच्या नेतृत्वाखाली महापालिकेच्या माध्यमातून नवी मुंबईत विविध थीम पार्क आणि उद्याने उभारण्यात आली आहेत. वंडर्स पार्क हे महाराष्ट्रातील एकमेव प्रख्यात असे पर्यटनस्थळ आहे. वंडर्स पार्क सुरू करण्यापूर्वी पर्यटकांच्या सुरक्षेची काटेकोर काळजी घेण्याची सूचना सागर नाईक यांनी महापालिकेच्या अधिकाऱ्यांना केली. खासकरून ज्या राईड्स आहेत, त्यांच्या सुरक्षिततेची खात्री करून घेण्यास सांगितले. निष्काळजीपणामुळे कोणताही अपघात होता कामा नये, असे ते म्हणाले.

माजी महापौर जयवंत सुतार यांनी वंडर्स पार्क पुन्हा खुले झाल्यानंतर या माध्यमातून पालिकेच्या उत्पन्नात भर पडेल, अशी प्रतिक्रिया दिली. माजी सभागृह नेते तथा स्थानिक नगरसेवक रवींद्र इथापे यांनी सांगितले की, वंडर्स पार्कचे जवळजवळ ९५ टक्के काम पूर्ण झालेले आहे. पाच टक्के विद्युत विषयक कामे बाकी आहेत. ती देखील येत्या काही दिवसात पूर्ण होतील. मुलांच्या परीक्षा देखील संपणार आहेत त्यामुळे वंडर्स पार्कचे उर्वरित काम लवकरात लवकर पूर्ण करून हे पार्क जनतेसाठी खुले करावे.



# स्त्रीचे पावित्र्य राखून तिचा सन्मान करा

## पेण येथील महिला मेळाव्यात स्वप्नाली डोईफोडे यांचे प्रतिपादन

**पेण : प्रतिनिधी**

बचत गटातील प्रत्येक महिलेने आपल्या मैत्रिणीला सहकार्याच्या माध्यमातून आपली आर्थिक उन्नती करण्याबरोबरच सध्याच्या बदलत्या काळातील सामाजिक परिस्थितीचा विचार करून मुलगा मुलगी हा भेदभाव न करता समानतेची वागणूक आपल्या घरापासूनच केली पाहिजे असे प्रतिपादन पेण तहसीलदार स्वप्नाली डोईफोडे यांनी बरडावाडी येथे झालेल्या जागतिक महिला दिन व सावित्रीबाई फुले स्मृतिदिन निमित्त आयोजित केलेल्या महिला मेळाव्यात बोलताना काढले.

साकव संस्था व रामकी फाउंडेशन व सक्षम फाउंडेशन यांच्या संयुक्तिक विद्यमाने बरडावाडी येथे बचत गटातील महिलांचा जागतिक महिला दिन व सावित्रीबाई फुले स्मृतिदिन याचे औचित्य राखून महिला मेळावा आयोजित केला होता.




साकव संस्थेचे सचिव अरुण शिवकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या मेळाव्याला प्रमुख पाहुणे म्हणून पेण तहसीलदार स्वप्नाली डोईफोडे, रामकी फाउंडेशनचे सतीश थिवर व सक्षम फाउंडेशनचे सुनील हेरोडे तसेच साकव संस्थेच्या महिला कार्यकर्त्या मंजुळा पाटील, पाबळ तलाठी सारिका तांडेल उपस्थित होते.

मेळाव्याला कोंडवी, जांबोशी, वरब, कळत, निगडे, देवळी, आमटेम, सालींदे, कासू या भागातील बचत गटातील महिला उपस्थित होत्या.

या मेळाव्याला मार्गदर्शन करताना स्वप्नाली डोईफोडे यांनी सांगितले, आज मी अधिकारी पदावर असले तरी माझे वडील मला मॅडम न म्हणता साहेब म्हणतात. हे सांगताना त्यापुढे म्हणाल्या की, स्त्री ही अंगणातल्या तुळशी सारखी आहे. मी घराच्या बाहेर पडताना तुळशीला सांगते की, आता कामासाठी बाहेर जात आहे आता तू माझ्या घराचे व संसाराचे रक्षण कर, आज बहुतांश पुरुष देखील तुळशीला वंदन करतात. ग्रामीण भागातील ही पुरातन काळापासून चालत आलेल्या या व्यवस्थेमध्ये समानतेचा एक अंगीकृत पायंडा आहे. तो धागा राखून सर्वांनी समाजापुढे आदर्श ठेवला पाहिजे. यापुढे मुलीचे वय १८ वर्षे झाल्याशिवाय लग्न करू नये, असे आवाहन त्यांनी केले.

या मेळाव्यात साकव संस्थेच्या मंजुळा पाटील, सक्षम फाउंडेशनचे सुनील हेरोडे, रामकी फाउंडेशनचे सतेज थीवर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी रामकी फाउंडेशनच्यावतीने कोंडवी येथे बचत गटातील निरक्षर महिलांकरिता प्रौढ साक्षरता वर्ग सुरू करण्यात आला असून याचे श्रीफळ सुनील हेरोडे यांच्या हस्ते फोडण्यात आले. लवकरच बरडावाडी येथे रामकी फाउंडेशनच्या वतीने शिवणवर्ग व कॉम्प्युटर वर्ग सुरू करण्यात येणार असल्याची माहिती रामकी फाउंडेशनचे सतेज थीवर यांनी दिली.

याप्रसंगी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर संगीता गायकर यांनी कला पथक सादर केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वेदांत पाटील यांनी केले हा मेळावा यशस्वी करण्याकरिता उमेश दोरे, मालती तांडेल, निमा घोलप, कृष्णा कमळ मात्रे, मनोज शिंदे यांनी सहकार्य केले.

**महिलांचा पुरस्काराने सन्मान**

**यावेळी रामकी फाउंडेशनच्यावतीने या भागातील नयना कदम-कोंडवी, रेश्मा धोंडू वाघ-वरब, शितल शरद जाधव-जांभोशी, अनिता यशवंत तांडेल-देवळी, ललिता किसन नाईक-निगडावाडी, हिरा यशवंत उघडा-बरडावाडी, प्रभावती संतोष गावंड-कासू, गुलाब जनार्दन वाघमारे- बरडावाडी यांना विशेष कार्याबद्दल महिला पुरस्कार देण्यात आले.**

# नागोठण्यातील उत्तर भारतीय समाजाचे नेते राजन दुबे यांचा भाजपमध्ये प्रवेश




**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणे येथील उत्तर भारतीय समाजाचे नेते राजन दुबे यांनी नुकताच सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते देशातील सर्वत बुलंद अशा भाजपमध्ये प्रवेश केला आहे. दुबे यांच्या समवेत आर. सी. दुबे, विनोद दुबे, जितेंद्र सिंग, पंकज शत्रुघन राय, सोनू गुप्ता, ऋषी गुप्ता आदींसह सुमारे ७०० उत्तर भारतीय समाजाच्या नागरिकांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

आमदार रवीशेठ पाटील यांच्या निवासस्थानी या पक्षप्रवेश सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. उत्तर भारतीय समाजाचे विभागात साधारणपणे दोन हजार पेक्षा अधिक मते आहेत आणि आगामी निवडणुकीच्या तोंडावर दुबे यांचा भाजपमध्ये प्रवेश म्हणजे एक परिवर्तनाची नांदी असल्याचे स्पष्ट दिसत आहे. या पक्षप्रवेश सोहळ्यासाठी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, आमदार रवींद्र पाटील, माजी आमदार धैर्यशील पाटील, पेणच्या नगराध्यक्षा प्रीतमताई पाटील, दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील, रायगड जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, राजेश मापारा यांच्या नेतृत्वाखाली हा प्रवेश सोहळा पार पडला. रोहा मंडलचे अध्यक्ष सोपान भाऊ जांभेकर, रोहा तालुका सरचिटणीस आनंद लाड, तसेच जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य व जिल्ह्यातील अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

### सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी केले स्वागत



**रोहा : शेणवई ग्रामपंचायतीचे माजी सदस्य जीवन देशमुख यांचे वडील कै. मधुकर पांडुरंग देशमुख यांचे नुकतेच निधन झाले आहे. माजी आमदार धैर्यशील पाटील यांनी देशमुख कुटुंबीयांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले. या वेळी प्रसाद भोईर, दिनेश शेलार, खेळू धमाल, परशुराम वाघमारे, सरपंच गणेश खरिवले, शशिकांत कडू, धनंजय पोकळे, सदानंद शेळके, अनिल भोई, यशवंत मोंडे, मंगेश ढमाल आदी उपस्थित होते.**

# रायगड जिल्ह्यात पथनाट्यातून शासकीय योजनांचा जागर

**रेवदंडा : प्रतिनिधी**

शासनाच्या विविध योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी रायगड जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा माहिती कार्यालय व श्रीसिद्धिविनायक मंडळाच्या वतीने नागाव, चौल, रेवदंडा, साळाव- मुरुड याठिकाणी शासनाच्या जनकल्याणकारी योजनांचा निर्णय वेगवान, महाराष्ट्र गतिमान या पथनाट्यातून जनजागृती करण्यात आली.

यामध्ये प्रधानमंत्री पीक विमा योजना, कृषी विकासाच्या योजना, सुधारित बीज भांडवल योजना, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम यांसह, ध्वजदिन निधी संकलन, सैनिकांप्रति आदर, अशा विविध विषयांवर जनप्रबोधन केले.

या कलापथकाचे नेतृत्व शीतल म्हात्रे करीत असून कलाकार म्हणून तुषान मढवी, श्रावणी राऊत, नेहा पाटील, सानवी म्हात्रे, मृदुला म्हात्रे, नेहा म्हात्रे आदी कलाकार सहभागी झाले आहेत. सदर पथनाट्यातून रायगड जिल्ह्यातील १८ ठिकाणी जनजागृती करण्यात येणार असल्याचे शीतल म्हात्रे यांनी यावेळी सांगितले.

जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यामध्ये सुरु झालेल्या या लोकजागराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप यांनी केले आहे.




# पालीतील उघड्या नाल्यावर अखेर झाकण बसविले

## नगरपंचायतीने दखल घेत केली कार्यवाही



**पाली : प्रतिनिधी**

पाली नगरपंचायत हद्दीतील साजन किराणा स्टोअर्सलगत व वरच्या मोहल्ल्यात जाणाऱ्या गल्लीजवळील नाला अनेक दिवस उघडा होता. त्यामुळे येथे झाकण बसवून मार्ग सुरक्षित करण्यात यावा या मागणीचे निवेदन येथील नागरिकांनी नगरपंचायतीला दिले होते. नगरपंचायतीने निवेदनाची तत्काळ दखल घेऊन धोकादायक नाल्यावर लोखंडी जाळीचे झाकण बसविले आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांमधून आभार मानले जात आहेत.

अनेक दिवसांपासून हा नाला खुला होता. त्यावर कोणत्याही प्रकारचे झाकण किंवा ग्रील टाकण्यात आलेले नव्हते. काही दिवसांपूर्वी या नाल्यात एक लहान मुलगा पडला होता तसेच येथून येणाऱ्या जाणाऱ्या वृद्ध, महिला व लहान मुलांना नाल्यात पडून दुखापत होण्याची शक्यता होती. तेथील रहिवाशांनाही हकनाक हा त्रास सहन करावा लागत होता. यामुळे नागरिकांनी तक्रार दिली होती. त्यानुसार अशोक सोनू रायकर, इरफान तालीब शेख, दीप्ती दत्तात्रेय दळवी, यशोदा जगताप व फैसल महाडकर यांनी नगरपंचायत पाली मुख्याधिकारी यांना समस्येचे निवेदन दिले होते. या निवेदनाची तत्काळ दखल घेऊन समस्याचे निराकरण करण्यात आले.

# भाजपकडून डॉ. दर्शन जैन यांचा सत्कार

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील नांदगावमध्ये राहणारे कोकबन येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रवीण जैन यांचा मुलगा डॉ. दर्शन जैन यांनी एमडी होण्यासाठी नीट पीजी परीक्षेत संपूर्ण देशातून २० वा नंबर घेतल्याने शुक्रवारी दर्शन जैन यांचा सत्कार भाजपच्यावतीने करण्यात आला. यावेळी डॉ. दर्शन जैन यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.



डॉ. दर्शन जैन यांनी एमबीबीएस शिक्षण पूर्ण करून लवकरच ते एम. डी. चा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी रवाना होणार आहेत. त्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा सुधा भाजपतर्फे देण्यात आल्या आहेत.

यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते आण्णा कंधारे यांनी मुरुड सारख्या ग्रामीण भगातून दर्शन जैन यांनी एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण करून एम. डी. होण्यासाठी त्यांनी नीट परीक्षा देऊन संपूर्ण देशातून २० वा नंबर प्राप्त करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

तालुकाध्यक्ष महेंद्र चौलकर यांनी जैन यांनी केलेली प्रगती मुरुड तालुक्यासाठी भूषणावह असून आम्हाला त्याचा सार्थ अभिमान आहे. त्याची अशीच प्रगती होवो ही ईश्वरचरणी प्रार्थना असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमासाठी ज्येष्ठ नेते आण्णा कंधारे, मुरुड तालुका भाजप अध्यक्ष महेंद्र चौलकर, तालुका उपाध्यक्ष सवप्नील चव्हाण, तालुका उपाध्यक्ष बाळा भगत, सरचिटणीस नरेश वारगे, मुरुड तालुका अल्प संख्यांक अध्यक्ष नसीम उल्डे, चिटणीस हनीफ उल्डे आदी उपस्थित होते.

# आरोग्य ही आपल्याजवळ असलेली महत्त्वाची संपत्ती -डॉ. मोहन काळे

## कर्जत फार्मसी महाविद्यालयातील शिबिराला लाभला उत्स्फूर्त प्रतिसाद



**कर्जत : प्रतिनिधी**

कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयात एम.जी.एम. वैद्यकीय महाविद्यालय, कामोठे, उन्नत भारत अभियान आणि इंडियन फार्मास्युटिकल असोसिएशन, रायगड शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा लाभ १५२ रुग्णांनी घेतला.

सरस्वती पूजन व दीप प्रज्वलित करून डॉ. इशान यांच्या हस्ते शिबिराचे उदघाटन करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. मोहन काळे, कविता घरत, संतोषी लोखंडे, मानसी कानगोकार, योगेश साखरे, प्रा.निलोफर खान, प्रा. रुपाली येवले, प्रा. तनिष्का ठाकरे प्रा. अनुजा जगदाळे आदी उपस्थित होते.

यावेळी डॉ. काळे यांनी जागतिक महामारीत लोकांना वाचवण्यासाठी डॉक्टर, फार्मासिस्ट व आरोग्य शेत्रातील हे खरे योद्धे आहेत. ते आपल्या शरीराशी संबंधित समस्या बरे करणारे आणि बरे करणारे देवांपैकी एक आहेत असे मानले जाते. डॉक्टर, फार्मासिस्ट हा अत्यंत निस्वार्थी आणि इतरांना मदत करण्यासाठी जीवनाचा भक्त असतो, शिवाय तेच एखाद्या व्यक्तीला त्याच्या दुःखातून मुक्त करतात. या आरोग्य तपासणी शिबिराचा मुख्य उद्देश केवळ वैद्यकीय समस्या शोधणे नव्हे तर उन्नत भारत अभियानांतर्गत महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या गावकऱ्यांना समस्या निर्माण होण्यापूर्वी जोखीम घटक आणि आजार ओळखणे हा होता. जेव्हा आपण निरोगी आणि तंदुरुस्त असतो तेव्हा आपण आपल्या जीवनाचा आनंद घेऊ शकतो. शेवटी आपल्या सर्वांना हे माहित आहे की आपले आरोग्य ही आपल्याजवळ असलेली सर्वात महत्वाची संपत्ती आहे.' असे स्पष्ट केले.

शिबिरात कम्युनिटी मेडिसिन, मेडिसिन, जनरल सर्जरी, ऑर्थोपेडिक, नेत्ररोग, बालरोग, ओबीजीवाय, त्वचा विभागातील एकूण सात डॉक्टर एक नर्स आणि एक रेडिओलॉजिस्ट सहभागी होते. परिसरातील गावांमधून रुग्ण सल्लामसलत करण्यासाठी आले असून त्यांनी चांगला प्रतिसाद दिला. बीपी, रक्तातील शुगरची पातळी तपासणे, त्वचेच्या समस्या, हाडांच्या समस्या, डोळे तपासणी सोबतच औषधांचे मोफत वाटप अशा विविध चाचण्या आणि सल्लामसलत करण्यात आली आहे. डॉ. पूर्वा लखोटिया, डॉ. लव कुशाग्रा, डॉ. पूजा जोशी, डॉ. मयंक पुरोहित, डॉ. अंजली पटेल, सुभान कुरेशी, डॉ. आदित्य मोरे, डॉ. पूर्वा लखोटिया, डॉ. अंजली पटेल आदींनी रुग्णांची तपासणी केली. विवेक शिंदे यांच्या शिल्पा मेडिकल स्टोअर्स, कळंबोली यांच्याकडून तसेच इंडियन फार्मास्युटिकल असोसिएशन, रायगड शाखे मार्फत मोफत औषधांचे वाटप करण्यात आले.

# एक दिवस सुंदर शाळेसाठी..!

- चोरढे येथील पालकांनी केले श्रमदान
- विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी स्तुत्य उपक्रम

**रेवदंडा : प्रतिनिधी**

शाळा सुंदर असावी, या उद्देशाने राजिप शाळा चोरढेच्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी शाळेचे बाह्यरंग सुधारण्यासाठी एक दिवस शाळेसाठी स्तूत्य उपक्रम राबवित श्रमदान केले.

चोरढे राजिप मराठी शाळेत शाळेसाठी पालकांनी एकदिवसाचे श्रमदान केले. यावेळी ४६ पालक उपस्थित होते. यामध्ये मोरेश्वर दुकले, सुनिल घाग, गंगाराम भोईर, कमलाकर घाग, प्रमिला घाग, सुरेश तांबडे, दिनेश घाग, प्रमोद चोरढेकर, परेश घाग, माधूरी शेडगे, द्रौपदी भोईर, स्वप्नाली घाग, लीना तांबडे, वैशाली घाग, अमिषा कोटकर, दिपाली शेडगे, महानंद पाटील, अश्विनी घाग, संतोष भोईर, उषा चोरढेकर, अलका चोरढेकर, निकिता डोलकर, भारती घाग, पाडुंरंग काजारे, मालती शेडगे, मनिषा चोरढेकर, उज्वला घाग, रजनी भोईर, निर्मला महाडिक, कांता घाग, सुषमा महाडिक, पायल महाडिक, शेवंती महाडिक, जयमाला महाडिक, नितेश घाग, हिरा भोईर, उषा सुभेदार, दिपाली अमलीकर, राखी भिकारी, मंथना काजारे, परशुराम चोरढेकर, आदी चोरढे, सावरोली व वेताळवाडीतील पालक उपस्थित होते.



यावेळी पालकांनी शाळेचे बाह्य रंगरूप सुधारण्यासाठी रेंजगा टेम्पोमध्ये भरून आणणे, लादी बसवणे, रेतीची वाहतूक करणे, जमिन लेव्हल करणे आदी कामात श्रमदान केले. तत्पुर्वी सुरेश तांबडे, सुनिल घाग श्रीफळ वाढवून कामाचा श्रीगणेशा केला. या कामासाठी गंगाराम भोईर व दिनेश घाग यांनी वाहतुकीसाठी टेम्पो सुविधा उपलब्ध केली. गावातील दुकानदार रवी यांनी शाळेसाठी लादी व इतर गोष्टी मुबलक किमंतीत दिल्या. चोरढे राजिप मराठी शाळेच्या पालकांच्या श्रमदानाचे स्तुत्य उपक्रमास मुरूड पंचायत समिती विस्तार अधिकारी सुनिल गवळी यांनी भेट दिली तर अलिबाग सोसायटीचे सदस्य देवानंद गोगर यांनी पालकवर्गाचे विशेष अभिनंदन केले.

कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी शाळा व्यवस्थापन अध्यक्ष सुरेश तांबडे, मुख्याध्यापक संगिता भगत, उपशिक्षक विजय जाधव, देवानंद गोगर व राजेंद्र नाईक प्रतिभा वर्तक यांनी सुयोग्य नियोजन केले होते.

**...तर शाळा प्रगतीचे शिखर गाठेल**

**विद्यार्थ्यांची गुणवत्ता सुधारणेसाठी, शाळेच्या भोतिक सुविधा सुधारण्यासाठी पालकांचा हिरीरीने वाटा असतो, असे तत्पर पालकवर्ग शाळेस लाभले तर शाळा नक्कीच प्रगतीपथावर जाईल, असे श्रमदान करणाऱ्या पालकांचे आभार व्यक्त करताना शिक्षक राजेंद्र नाईक यांनी म्हटले.**

# गुजरातची दिल्लीवर रोमहर्षक मात

## डब्ल्यूपीएलमध्ये आव्हान कायम

**मुंबई : प्रतिनिधी**

महिला प्रीमियर लीगमध्ये (डब्ल्यूपीएल) गुजरात जायंट्सने मालिकेतील आव्हान कायम राखत रोमांचक सामन्यात दिल्ली कॅपिटल्सवर ११ धावांनी विजय मिळवला. दिल्लीचा संघ सध्या पाचपैकी चार सामने जिंकून गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर आहे. त्याचबरोबर गुजरातचा संघ पाचपैकी एक सामना जिंकून शेवटच्या म्हणजेच चौथ्या स्थानावर आहे.

नाणेफेक हारल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना गुजरातने २० षटकांत चार गडी गमावून १४७ धावा केल्या होत्या. एल. वोल्वार्डने ५७ आणि ॲशले गार्डनरने ५१ धावांचे योगदान दिले. प्रत्युत्तरात दिल्लीचा संघ १८.४ षटकांत सर्वबाद १३६ धावांवर आटोपला. एकवेळ दिल्लीच्या आठ



विकेट्सवर १२३ धावा झाल्या होत्या. त्यानंतर त्यांना १३ चेंडूंत १३ धावांची गरज होती. अरुंधती रेड्डी-शिखा पांडे खेळपट्टीवर होत्या आणि या दोघींमध्ये ३५ धावांची भागीदारी झाली. यानंतर किम गर्थने अरूंधतीला बाद करीत सामना उलटवला. ती १७ चेंडूंत चार चौकारांच्या मदतीने २५ धावा करून बाद झाला. पुढच्याच षटकामध्ये गार्डनरने पूनम यादवला (०) बाद करीत गुजरातला विजय मिळवून दिला.

प्रथम फलंदाजी करणाऱ्या गुजरात संघाची सुरुवात खराब झाली. एकापाठोपाठ विकेट पडत असताना वोल्वार्ड आणि गार्डनरने महत्त्वपूर्ण खेळी केली. बेथ मुनीच्या दुखापतीमुळे वोल्वार्डचा गुजरात संघात समावेश करण्यात आला. आता ती संघासाठी महत्त्वाची ठरत आहे. लीगमधील तिच्या दुसऱ्याच सामन्यात तिने अर्धशतक झळकाविले. ४५ चेंडूंत ५७ धावा करून ती बाद झाली. या खेळीत सहा चौकार आणि एका षटकाराचा समावेश होता. गार्डनरनेही तुफानी खेळी खेळली. तिने ३३ चेंडूंत नऊ चौकारांच्या मदतीने नाबाद ५१ धावा केल्या. दिल्लीकडून जोनासेनने दोन गडी बाद केले. त्याचवेळी मारिजाने कॅप आणि अरुंधती रेड्डीला प्रत्येकी एक विकेट मिळाली.





मुंबई : ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात भारतीय गोलंदाज मोहम्मद शमी आणि मोहम्मद सिराज यांनी भेदक गोलंदाजी केली. या दोघांनी प्रत्येकी तीन गडी बाद करीत 'कांगारूं'चे कंबरडेच मोडले. त्यांना अन्य गोलंदाजांनी चांगली साथ दिली. त्यामुळे ऑस्ट्रेलियाचा डाव ३५.४ षटकांमध्ये १८८ धावांत गुंडाळला गेला.

# यूएईच्या फलंदाजाचे वादळी शतक

**कीर्तिपूर : वृत्तसंस्था**

युएईचा फलंदाज आसिफ खानने नेपाळविरुद्ध झालेल्या सामन्यात इतिहास घडवला. आसिफने ४१ चेंडूंत वादळी शतक झळकाविले. कोणत्याही असोसिएट देशाच्या फलंदाजाने केलेले हे सर्वांत वेगवान शतक आहे, मात्र त्याच्या या खेळीनंतरही युएईचा पराभव झाला. नेपाळने लढत डकवर्थ लुइस नियमाने जिंकली.

खरेतर या सामन्यात आसिफने संथ सुरुवात केली होती. त्याने सुरुवातीच्या २४ चेंडूंत फक्त २३ धावा केल्या होत्या. त्यानंतर तो गोलंदाजांवर तुटून पडला. पुढील सहा चेंडूंत चार षटकारांसह त्याने एकूण ३० चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले. अर्धशतकानंतर तो अधिक आक्रमक झाला. त्याने पुढील ११ चेंडूंत सात षटकारांच्या मदतीसह शतक पूर्ण केले. यात आसिफने संदीप लामिछानेच्या गोलंदाजीवर चार चेंडूंवर चार षटकार मारले. त्याने ११ षटकार आणि चार चौकारांसह ४२ चेंडूंत नाबाद १०१ धावा केल्या. वनडे क्रिकेटच्या इतिहासातील हे चौथ्या क्रमांकाचे सर्वांत वेगवान शतक ठरले. हा विक्रम दक्षिण आफ्रिकेच्या एबी डिव्हिलियर्सच्या नावावर आहे. त्याने वेस्ट इंडिजविरुद्ध फक्त ३१ चेंडूंत शतक ठोकले होते. न्यूझीलंडच्या कोरी अँडरसनने ३६, तर पाकिस्तानच्या शाहिद आफ्रिदीने ३७ चेंडूंत शतक पूर्ण केले होते.



या सामन्यात टॉस जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या युएईने ५० षटकांत सहा बाद ३१० धावा केल्या. नेपाळने ४४ षटकांत सहा बाद २६९ धावा केल्या असताना खराब प्रकाशामुळे मॅच थांबवावी लागली. नंतर नेपाळला नऊ धावांनी विजयी घोषित करण्यात आले.

# युवराज सिंगने घेतली ऋषभ पंतची भेट

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टीम इंडियाचा स्टार यष्टिरक्षक-फलंदाज ऋषभ पंत अपघातात मृत्यूला मात देऊन बरा झाला आहे. अलीकडेच त्याने स्विमिंग पूलमध्ये उतरतानाचा एक व्हिडिओ ट्विट केला होता. आता माजी स्टार अष्टपैलू युवराज सिंगने पंतची भेट घेऊन त्याच्या फिटनेसबाबत माहिती सांगितली. युवीने पंतसोबतचा एक फोटोही पोस्ट केला.

फोटोमध्ये युवी आणि पंत सोफ्यावर बसले आहेत. पंतच्या उजव्या पायाला अजूनही पट्टी बांधलेली आहे, ज्यामुळे त्याच्या दुखापतीचा अंदाज लावता येईल. पंतला भेटल्यानंतर युवराजने आपल्या पोस्टमध्ये लिहिले, छोटी-छोटी पावले सुरू झाली आहेत. हा चॅम्पियन लवकरच पुन्हा उठण्यासाठी सज्ज झाला आहे. युवराजने पुढे लिहिले, त्याला भेटून आणि मजा-मस्ती करून खूप छान वाटले. किती छान मुलगा, नेहमी सकारात्मक आणि मजेदार वृत्ती. ऋषभ तुला खूप शक्ती मिळो.

# आजपासून अलिबागमध्ये कला, क्रीडा महोत्सव

## विजेत्यांना पदके, सहभागींना मिळणार प्रशस्तीपत्र

**अलिबाग : प्रतिनिधी**

माणुसकी प्रतिष्ठान, रायगड प्रिमियर लिग आणि सुरभी स्वयंसेवी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने १८ ते २० मार्च या कालावधीत अलिबाग तालुका शालेय कला आणि क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे, आहे अशी माहिती या महोत्सवाचे निमंत्रक माणुसकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. राजाराम हुलवान यांनी पत्रकार परिषदेत दिली.

आमदार महेंद्र दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली या महोत्सवाचे आयोजन केले जात आहे. महोत्सवासाठी आरसीएफ थळ यांचे प्रयोजकत्व लाभले आहे, असे डॉ. हुलवान यांनी सांगितले. रायगड प्रीमियर लीगचे सचिव व रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे कार्योपाध्यक्ष जयंत नाईक, सुरभी सेवाभावी संस्थेच्या अध्यक्ष सुप्रिया जेधे, रायगड जिल्हा परिषद जिल्हा समन्वयक संदीप वारगे या वेळी उपस्थित होते.



महोत्सवात २०० मी., ८०० मी. धावणे, लांब उडी, गोळाफेक, कबड्डी, खो खो, पासिंग व्हॉलीबॉल, सायकलिंग, फुटबॉल, लाठीकाठी आणि बुद्धिबळ तसेच संपूर्ण रायगड जिल्ह्यात नव्याने प्रसार होत असलेल्या महिला (१९ वर्षांखालील) लेदरबॉल क्रिकेट या क्रीडा प्रकारांचा समरवेश करण्यात आला आहे.

स्पर्धा कुरूळ येथील आरसीएफ क्रीडा संकुल, जिल्हा पोलीस कार्यालयाचे मैदान, नेहुली येथील जिल्हा क्रीडा संकुल आणि महिला लेदर बॉल क्रिकेट स्पर्धा खानाव येथे होणार आहेत. सर्व सहभागी खेळाडूंना, शाळांना प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे, तर विजेत्या खेळाडूंना पदके देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. स्पर्धा शालेय विद्यार्थ्यांसाठी असल्याने ज्या शाळेतील विद्यार्थी जास्त पदके मिळवतील त्या शाळेला स्पर्धा विजेतेपदाचा चषक देण्यात येईल.

